# उपासना श्रीमहागणपतीची

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१८८

ग
णे
शा
य
न
मः



मं
ग
ल
मू
र्ति
मो
र
या

REFBK-0020107
REFBK-0020107

( भक्तियोग प्रकाशन पुष्प ६ )

# अनुक्रमणिका



| अनु. क्र. | विषय | पृष्ठांक |
| --- | --- | --- |
| १ | नम्र निवेदन | १ |
| २ | भक्तियोग प्रकाशन कार्याचा आढावा | ३ |
| ३ | मंगलाचरण | ६ |
| ४ | ही काव्याची माला दुर्वांची | ७ |
| ५ | संकट नाशनं श्री महागणपतिस्तोत्रम् | १० |
| ६ | श्रीगणेशद्वादशनामस्तोत्रम् | ११ |
| ७ | श्री वासुदेवानंद सरस्वतीकृत श्रीगणपतिस्तोत्रम् | १२ |
| ८ | श्रीमत् शंकराचार्य रचित श्रीगणपतिस्तोत्रम् | १३ |
| ९ | श्री गणपति अथर्वशीर्ष (संस्कृत) | १५ |
| १० | श्रीगणपति अथर्वशीर्षाचा गेय अनुवाद | २३ |
| ११ | श्री गणेश नामावलि | २८ |
| १२ | श्री गणपतीची व्रतें -- | ३३ ते ३८ |
| १३ | दूर्वामहात्म्य | ३९ |
| १४ | दूर्वा वाहतांना म्हणावयाचे मंत्र | ४० |
| १५ | मंत्रोपासना : श्रीगणेशाचे लाभदायी मंत्र | ४१ |
| १६ | श्री गणेश गीतांजलि | ४३ ते ५३ |
| १७ | आरत्या — | ५४ ते ५९ |
| १८ | संत ज्ञानेश्वरकृत श्रीगणेशवर्णन | ६१ |
| १९ | संत रामदासकृत श्रीगणेशवर्णन | ६२ |
| २० | अथर्वशीर्षाचा श्लोकबद्ध (मराठी) अनुवाद | ६५ ते ६८ |
| २१ | अष्टविनायकांची आरती | ..... |

काव्य · २१८८

भक्तियोग प्रकाशन पुष्प ६

# उपासना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 20906

# श्रीमहागणपतीची

प्रार्थना, स्तवन, स्तोत्रें, व्रतें, मंत्र, गीतांजलि (अथर्वशीर्ष गीतमालेसह), अथर्वशीर्ष (गद्य आणि श्लोकबद्ध अनुवाद यांसह), आरत्या, मंत्रपुष्पांजलि इ. इ.

ादक : दत्ता साळगांवकर
उपाख्य
'दत्तप्रभु'

REFBK-0020107
REFBK-0020107

मूल्य १५० पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 20906

# उपासना श्रीमहागणपतीची

**प्रथमावृत्ति** : ५-९-७४ (संकष्टी)

**प्रति** : २,१००

**मुद्रण व्यवस्था** : शुभ प्रिंटींग अँड अॅडव्हर्टायझींग
सर्व्हिसेस, मुंबई २८.

द्वारा **बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, प्रा.** लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
मुंबई ३१ येथे मुद्रित.

☆ **एकाक्षर जुळणी** : अक्षर प्रतिरूप प्रा. लि., मुं. ३१

☆ **ठसे** : मे. राऊत आणि कंपनी, माहीम, मुं. १६.
मे. द्वारकानाथ आणि कंपनी, गिरगांव, मुं. ४.

**प्रकाशक** : श्री. दत्ता साळगांवकर उर्फ 'दत्तप्रभु' संचालक,
भक्तियोग प्रकाशन, ९, शॉपिंग सेंटर, सहकारनगर
वडाळा, मुंबई ४०००३१.

## कृतज्ञता निर्देश —

ह्या पुस्तकाच्या प्रकाशन कार्मी ज्या ज्या व्यक्तींनीं वा संस्थांनीं आमच्याशीं सक्रीय '**सुयोग सहकार**' साधला त्या सर्वांची परस्पर श्रीगणेश सेवा श्रीगणेशचरणीं रुजू होवो ही प्रार्थना करून आम्ही आमची कृतज्ञता व्यक्त करतों.

संपादक-संचालक,
**भक्तियोग प्रकाशन**

२०९०६८
२४।११।७४



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 209068 दि:
२१८८

# श्री संत पाचलेगांवकर महाराज

## यांचा शुभाशीर्वाद


"भक्तियोग प्रकाशनची प्रथमावस्थेंतील पांचही प्रकाशने अवलोकिली. भक्तियोग प्रकाशनचे संचालक हे कर्मचारी ( मुद्रण व्यावसायिक ) असूनही हा स्तुत्य उपक्रम करतात त्याबद्दल त्यांचे कौतुक करावेसे वाटते.

त्यांच्या हातून त्यांच्या 'भक्तियोग प्रकाशन' द्वारे ह्याहूनही मोठी वाङ्मयसेवा घडो हा आमचा शुभाशीर्वाद आहे,

मुलुंड, ५-८-७४

न. स. पाचलेगांवकर
मुक्तेश्वर आश्रम, खामगांव ( विदर्भ )

# थोर श्रीगणेशभक्त
# श्री अप्पाशास्त्री जोशी



# यांची अभिप्रायपर नांदी

॥ ॐ श्रीगणराज समर्थ ॥

भक्तियोग प्रकाशनातर्फे संकलित २१ श्रीगणेशस्थानांच्या परिचय मालेतील, श्री महागणपतीच्या उपासनेची ही नांदी लिहिताना मला आनंद वाटत आहे. ह्या छोटयाशा पुस्तकांत भक्तियोग प्रकाशनाचे सूत्रधार श्री. दत्ता साळगांवकर यांनी गणेशभक्तांना अत्यंत उपयुक्त अशा स्तोत्रांचा, मंत्रांचा, व्रतांचा, गीतांचा व आरत्यांचा संग्रह केला आहे. आरत्यांची शीर्षके अभिनव पद्धतीने दिली आहेत.

श्री. मधुकर जोशी व प्रा. डॉ. सी. ग. देसाई ह्यांच्या नवीन काव्यरचना प्रासादिक व सुंदर आहेत. अथर्वशीर्षाचे मराठी श्लोकबद्ध रूपांतर उत्स्फूर्त, रसाळ व श्रीगजाननाच्या कृपेने अवतीर्ण झालेले असावे. ते नित्य वाचनात ठेवण्यास योग्य असेच आहे. श्री. साळगांवकर यांना धार्मिक वाङ्मय प्रकाशनाच्या ह्या कार्यात श्रींच्या कृपेने उत्तरोत्तर उत्तम यश लाभावे अशी श्रीगजाननाला प्रार्थना. इति शम् ।

॥ जय जय गणराज समर्थ ॥

—विनायक परशराम तथा अप्पाशास्त्री जोशी
अमृतकुंभ सोसायटी, स्वाति अ४,–
(डोंगरेबाग), दादर, मुंबई २८.



भक्तियोग प्रकाशनच्या विद्यमाने
येत्या नवरात्री उत्सवप्रसंगीं

**श्री देवी स्तवन**

पुस्तिका प्रकाशित होईल.

# श्रीमहागणपति

( टिटवाळा )



# अष्टविनायकांची आरती

रचना : डॉ. सी. ग. देसाई

जयदेव जयदेव जय गणपति देवा
संकटनाशक म्हणूनी तूझा करूं धांवा ॥ धृ ॥

कार्यारंभी पूजा सारे तव करिती
मोदक लाडू खाद्ये प्रिय तुज अर्पीती
दूर्वांकुर तांबडे फुल तुला जगती
वाहूनि भक्तां होते इच्छित फलप्राप्ती ॥ १ ॥

मोरगांवक्षेत्री, श्रीमोरेश्वर
ओझरगांवी झाला, श्रीविघ्नेश्वर
सिद्धटेकी आहे, सिद्धिविनायक
थेऊरिचा चिंतामणि, पुण्यप्रद लोक ॥ २ ॥

लेण्याद्रीमध्ये तो, श्रीगिरिजात्मज
देव महढीचा, श्रीवरदराज
पालीमध्यें शोभे बल्लाळेश्वर
रांजणगांवीचा श्रीगणपति थोर ॥ ३ ॥

॥ मंगलमूर्ति मोरया ॥

# नम्र निवेदन

नोकरीधंदा सांभाळूनही अल्पशा नफा-तोट्याचा एक सहउद्योग म्हणून भक्तियोग प्रकाशनची नम्र सुरवात झाली व अवघ्या दोन-अडीच वर्षांत भक्तियोग प्रकाशननें बाळसें धरलें आणि किमान ५ हजार कुटुंबांमध्यें भक्तियोग प्रकाशन स्वतःचें आदराचें स्थान निर्माण करूं शकलें. **ही गोष्ट शक्य झाली, अनेक मुद्रण व्यवसायाधिकाऱ्यांच्या स्नेहमय सहकार्यामुळेंच.**

प्रकाशनक्षेत्रांत नव्यानेंच पदार्पण करतांना येणाऱ्या अडीअडचणींशी यशस्वी मुकाबला करीत **भक्तियोग प्रकाशनचें** हें सहावें पुष्प प्रकाशित होत आहे. कागद टंचाई, कागदाचे तिप्पट वाढलेले दर, प्रवास खर्चांतील बेसुमार वाढ आणि मुद्रणविषयक बाबींची वाढती महर्गता अशीं अनेक महाविघ्नें रुद्रावतारानें पुढें ठाकली असतांही विघ्नहर्त्या श्रीगणेशाची महति गाण्याचा प्रयत्न करणारें "**उपासना श्री महागणपतीची**" हें पुस्तक भाविकांस सादर करतांना आमचें हृदय भक्तिभावानें भरून येत आहे. कारण मुद्रणव्यवसायांतील एक साधा कामगार भले-बुरे अनुभव घेत एक छोटा 'प्रकाशक' बनूं पहात आहे—व आपल्या प्रकाशनच्या कुबडीच्या सहाय्यानें यथामति यथाशक्ति भक्तिमार्गप्रसारकार्यास हातभार लावण्याचा नम्र प्रयत्न करीत आहे.

**'उपासना श्रीमहागणपतीची'** हें छोटेखानी पुस्तक त्वरित प्रकाशित होण्याचें विशेष श्रेय मान्यवर पांडुरंग दाजीबा मोरे. **(संचालक, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. मुंबई ३१) यांनाच आहे.**

कारण त्यांच्याच उत्तेजनपूर्वक सहकार्यामुळें हें पुष्प गुंफण्याची प्रेरणा व शक्ति मिळाली व श्रीगणेशोपासनेस अत्यंत पूरक ठरूं शकणारें हें पुस्तक केवळ दीड रु. किमतीस विक्रीस उपलब्ध करतां येण्याची शक्यता प्राप्त झाली.

सेतुबंधनाचे वेळीं इवल्याशा खारीनें केलेली मदत (सेवा) प्रभु रामचरणीं रुजू झाल्याचें सर्वांस ज्ञात आहेच. तद्वतच 'भक्तियोग प्रकाशन' द्वारें आम्हीं केलेली ही भक्तिमार्ग प्रसारकार्यरूपी सेवा श्रीगणेशचरणीं रुजू होवो व पुढेंही अशाच प्रकारची सेवा आमच्या हातून घडविण्याची कृपादृष्टि श्री गणपति करोत हीच प्रार्थना !

जय गजानन !

हरि ॐ ! हरि ॐ ! हरि ॐ ! हरि ॐ ! हरि ॐ !

'दत्त प्रभु'

वडाळा, संचालक, भक्तियोग प्रकाशन.

मुंबई ४०० ०३१

**भाविक सुशिक्षितांस खूष खबर !**

# "नित्य- आनंद"--

हे नियतकालिक महिन्याच्या २ऱ्या व ४ थ्या गुरुवारी प्रकाशित केलें जाणार आहे व तें किरकोळ विक्रीला उपलब्ध न करतां केवळ वर्गणीदारांपुरतेंच मर्यादित ठेवलें जाणार आहे. (**कारण कागद टंचाई !**)

ज्या कोणास भक्तियोग प्रकाशनशीं ह्याबाबत लेखन-सहकार्य करावयाची इच्छा असेल त्यांनी कृपया लिहावें:

**भक्तियोग प्रकाशन**

शॉप नं. ९, शॉपिंग सेंटर, सहकारनगर,

वडाळा, मुंबई ४००-०३१.

## ‘भक्तियोग प्रकाशन’- कार्याचा आढावा—

परार्थ आणि परमार्थ यांची सांगड घालणारा आजच्या युगांतील एकमेव मार्ग म्हणजे **भक्तियोग** !

विशिष्ट आंतरिक प्रेरणेनें **भक्तियोग प्रकाशनची** नम्र सुरवात १६ मे १९७२ (अंगारक योग विनायकी) या शुभदिनीं झाली. उद्‌घाटनानिमित्त डोंबिवली येथे ‘ **मोरया नामी मी रंगावें** ’ ही गणेश गौरवपर संगीतिका उपस्थित भाविकांस (विनामोबदला) ऐकवण्याचा सुयोग प्राप्त झाला.

प्रकाशनकार्याचा श्रीगणेशा—‘**श्रीगणपतिभक्तिदर्शन**’ या पुस्तकानें झाला. सद्‌भाग्यानें हे पुस्तक संपादन करण्याच्या कामी डॉ. सी. ग. देसाई, कवि मधुकर जोशी, सौ. मुक्ता केणेकर प्रभृति मान्यवर साहित्यिकांकडून उत्स्फूर्त सहकार्य लाभलें. श्री. बाबुराव गांडोळे (श्रमिक पत्रकार) यांनीं स्वरचित **श्रीटिटवाळामहागणपतिदर्शन** हे ओवीबद्ध स्तोत्र सदरहु पुस्तकांत पुनर्मुद्रित करण्याची परवानगी दिली. सदरहु पुस्तकाचें प्रकाशन बडोदा येथे **राजमाता शांतादेवी गायकवाड** यांच्या शुभहस्ते होण्याचा सुयोग येऊन **भक्तियोग प्रकाशन** कृतार्थ झालें. त्याचवेळीं ‘ **मोरया नामी मी रंगावे** ’ ही संगीतिकाही पुस्तकरुपाने **भक्तियोग प्रकाशनच्या** विद्यमानेंच प्रकाशित करण्यात आली.

भाविकांनी सक्रीय सहकार्य दिल्यामुळे ‘ **श्रीगणपतिभक्तिदर्शन** ’ पुस्तकाची द्वितीयावृत्ती अवघ्या एक महिन्याचे आंत छापतां आली व पुस्तकाची किंमतहि अवघी ५० पैसे ठरवता आली.

यथावकाश ‘ **भावार्थ रामरक्षा** ’ ‘ **हरिपाठ** ’ आणि ‘ **श्रीदेवी शर्वाणी वेताळ महारुद्र पंचायतन** ’ हीं छोटी मोठीं पुस्तके **भक्तियोग प्रकाशनतर्फे** प्रकाशित झाली.

भक्तियोग प्रकाशनतर्फे श्री. आर. एन्. पराडकर. श्री. वसंत वाळुंजकर, श्री. वसंत आजगांवकर, श्री. दशरथ पुजारी, प्रभृति ख्यातनाम गायकांचे व श्री. आपटे (भाविक--गायक) यांचें भक्तिसंगीत सादर करण्यांत आलें.

भक्तिमार्ग प्रसारकार्यास पूरक असें एक नियतकालिक लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याचा भक्तियोग प्रकाशनचा मानस आहे.

सदरहु नियतकालिक दर पंधरा दिवसांनी येणाऱ्या (alternate) गुरुवारीं प्रकाशित केले जाईल.

न्यूजपेपर रजिष्ट्रार, भारतसरकार, यांजकडे खालील १५ नांवे मंजुरीसाठी रवाना झाली आहेतच:

(१) आत्मानंद (२) नित्य-आनंद (३) सुखकर्ता, (४) "मेरुमणि," (५) "भक्तिप्रदीप," (६) "नवप्रदीप," (७) धर्मप्रदीप (८) साद (९) अप्रतिम (१०) अनुपम (११) नक्षत्र (१२) मधुकर (१३) ज्ञानदीप (१४) धर्मप्रकाश आणि (१५) श्रीप्रसाद.

उपरोक्त मंजुरी प्राप्त होताच सरकारी नियमानुसार ६ आठवड्याचे आंत पाक्षिकाचें प्रकाशन सुरु होईल.

सदरहु पाक्षिकाची वार्षिक वर्गणी फक्त रु. अकरा आकारली जाऊन त्यांत किमान १६ पानी भाविक साहित्य, देवदेवतांचे फोटो, संतचरित्रें इ. मजकूर नियमितपणे प्रकाशित केला जाईल व प्रत्येक अंकांत किमान एक तरी फ्रेम करण्यालायक चित्र दिलें जाईल. इच्छुकांस **नमुना अंक** विनामूल्य पाठवून देण्याची खास व्यवस्थाहि केली जाईल.

कागद टंचाईच्या महासंकटांमुळे सदरहु पाक्षिक सध्या-तरी केवळ वर्गणीदारांपुरतेच मर्यादित ठेवावे लागणार आहे.

सदरहु बाबतींत कोणत्याहि प्रकारचें सक्रीय सहकार्य देऊ इच्छिणाऱ्यानीं कृपया खालील पत्त्यावर

**पत्रव्यवहार करावा.**

**भक्तियोग प्रकाशन**

शॉप नं. ९, शॉपिंग सेंटर, सहकारनगर,
वडाळा, मुंबई ४००-०३१.

# श्री दत्तात्रेय स्तवन मंजिरी

ब्रह्मा--विष्णु--महेश्वर यांचा अवतार श्री दत्तात्रेय महाराज यांचीं अनेक स्तवनें, करुणाष्टक, आरत्या इ. एकत्र गुंफून **श्री दत्तात्रेय स्तवन मंजिरी** हें पुस्तक येत्या दत्तजयंतीपूर्वी भाविकांस उपलब्ध होणार आहे.

सदरहु पुस्तकाचें परिशिष्ट म्हणजे श्री दत्तात्रेय--अवतारी विभूतींचें जीवन व कार्य यांचा संक्षेपित आढावा घेणारें स्वतंत्र प्रकरण असेल.

सदरहु संबधांत लेखन सहकार्य करूं इच्छिणारांनीं लवकरांत लवकर—

**भक्तियोग प्रकाशन**

शॉप नं. ९, शॉपिंग सेंटर, सहकारनगर
वडाळा मुंबई ४००-०३१

ह्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा !

इच्छुकांच्या **सुयोग सहकाराची** अवश्य नोंद घेतली जाईल.

# — मंगलाचरण —



## श्री गणेशाय नमः

वक्रतुन्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥
नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः
प्रणताः स्मताम् ॥
श्रीगुरुभ्यो नमः ॥
ॐ ऱ्हीं नमः शिवाय ॥

# प्रार्थना

## ‘ गोसावीसुत ’ कृत श्रीगणेश प्रार्थना

प्रारंभी विनती करूं गणपति विद्या दयासागरा ।
अज्ञानत्व हरूनि बुद्धि मति दे आराध्य मोरेश्वरा ॥ १ ॥
चिंता क्लेश समस्त दुःख अवघे देशांतरा पाठवीं
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवीं ॥ २ ॥
नेत्रीं दोन हिरें प्रकाश पसरे अत्यंत ते साजिरे
माथां शेंदूर पाझरे वरि बरे दूर्वांकुराचे तुरे ।
माझें चित्त विरे मनोरथ पुरे देखोनि चिंता हरे
गोसावीसुत वासुदेव कवि रे त्या मोरयाला स्मरे ॥ ३ ॥

# ही काव्याची माला दुर्वांची

**मंगलमूर्ति** स्मरतां चित्तीं श्री गणरायाची ॥
गातां गीति, जाते भीति सकलहि विघ्नांची ॥ १ ॥
गणपति साचा देव मुळाचा तो ॐकाराचा ॥
सर्व जगाचा ब्रह्मांडाचा नायक सकलांचा ॥ २ ॥
ऋद्धिसिद्धीचा जीवबुद्धीचा प्रेरक हा साचा ।
सुरासुरांचा ब्रह्मांडाचा यक्षराक्षसांचा ॥ ३ ॥
हरीहरांचा तसा विधीचा भूत किन्नरांचा ।
तो मनुजांचा मुनीजनांचा तसाच सिद्धांचा ॥ ४ ॥
निधि गुणांचा विधि जगाचा उदधि ज्ञानाचा ।
पुष्ट तनुचा सुष्ट मनाचा तुष्ट ही भावाचा ॥ ५ ॥
सेव्य सुरांचा दिव्य मतीचा भव्य दर्शनाचा ।
तो ज्ञानाचा, विज्ञानाचा आत्मा वेदांचा ॥ ६ ॥
विचार करितां गेला आतां संशय विलयाला ।
मूळ देवता हीच तत्त्वतां पटते हृदयाला ॥ ७ ॥
पुष्प तांबडें ज्यास आवडे दूर्वांकुर भारी ।
जो सुखकारी विघ्ननिवारी पाशांकुशधारी ॥ ८ ॥

देई शांति नेई भ्रांति दैत्यां संहारी ।
रविसम कांति दशदिक्प्रांती पसरे महीवरी ॥ ९ ॥
काळापुढती नाही गणती विक्रम कोणाचा ।
चिरंजीवाचा दीर्घायूचा घातक सकलांचा ॥ १० ॥
सुरासुरांचा ब्रह्मांडाचा भक्षक सर्वांचा ।
सामर्थ्याचा महिमा साचा अगाध काळाचा ११ ॥
परंतु साचा तूं काळाचा महाकाळ झाला ।
जिंकून त्याला अंकित केला किंकर सेवेला ॥ १२ ॥
बंड कशाचें त्या काळाचें दंडक तूं त्याला ।
केलें वाहन सत्य गजानन काळ मूषकाला ॥ १३ ॥
काळावरचें पूर्ण यशाचें तव बल हें साचें ।
वर्णायाचें बळ कोणाचें थकलें शेषाचें ॥ १४ ॥
वदन सर्वथा काय कविकथा तव गुणापुढती ।
करितो देवा भावें सेवा साष्टांगें प्रणति ॥ १५ ॥
पंचतत्त्व तूं ब्रह्मरूप तूं तूंच भास्करेंदु ।
सर्व सृष्टी तूं नाहीं किंतु तूंच दीनबंधु ॥ १६ ॥
देवा आद्या चौदा विद्या त्या चौसष्ट कला ।
द्याव्या आतां गणपतिभक्ता तव गुण गायाला ॥ १७ ॥
त्या श्रेयाचा गणरायाचा सेवक पायाचा ।
आहे साचा तत्प्रेमाचा रामकृष्ण ज्याचा ॥ १८ ॥

विघ्नहारका विश्वपालका सकल सुखकारका ।
सूत्रचालका भक्तरक्षका गणेश विनायका ॥ १९ ॥
या दासाचे पुरवायाचे हेतु हृदयाचे ।
प्रसन्न व्हावे दर्शन द्यावे देवा ज्ञानाचें ॥ २० ॥
सदाशिवाची गणरायाची शुद्ध प्रेमाची ।
**ही काव्याची सद्‌भावाची माला दुर्वांची ॥ २१ ॥**

---

**भक्तियोग प्रकाशनचें** शुभारंभी पुष्प
**श्री गणपति भक्तिदर्शन** मध्यें सर्व प्रथम
प्रकाशित झालेल्या दीर्घ काव्याचा २१–**श्लोकी संक्षेप**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20900

# श्री गणपति भक्तिदर्शन

**पुस्तक आपल्या संग्रही ठेवाच !**

# "संकट नाशनं श्रीमहागणपति स्तोत्रम्"

"एका बैठकीत हे स्तोत्र १४४ वेळा एकाग्रतेने पठण केल्याने कोणतीहि मनकामना पूर्ण होते" असा ह्या स्तोत्राचा **सार्थ लौकिक** आहे.

**नारद** उवाच —- श्री गणेशाय नमः ।।
प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् ।
भक्तावासं स्मरेन्नित्यमायुःकामार्थसिध्दये ।।
प्रथमं **वक्रतुंडं** च **एकदंतं** द्वितीयकम् ।
तृतीयं **कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं** चतुर्थकम् ।।
**लम्बोदरं** पंचमं च षष्ठं **विकटमेव** च ।
सप्तमं **विघ्नराजेन्द्रं धूम्रवर्णं** तथाष्टमम् ।।
नवमं **भालचन्द्रं** च दशमं तु **विनायकम्** ।
एकादशं **गणपतिं** द्वादशन्तु **गजाननम्** ।
द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन् नरः
न च विघ्नभयं तस्य सर्वसिध्दिकरं प्रभो ।।
विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम् ।
पुत्रार्थी लभते पुत्रान् मोक्षार्थी लभते गतिम् ।
जपेद्गणपतिस्तोत्रं षड्भिर्मासैः फलं लभेत् ।
संवत्सरेण सिद्धिं च लभते नात्र संशयः ।
अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत्
तस्य विद्या भवेत्सर्वा श्रीगणेशस्य प्रसादतः ।।

## श्रीगणेशद्वादशनामस्तोत्रम् ।

शुक्लांबरधरं देवं शशिवर्णं चतुर्भुजम् ॥

प्रसन्नवदनं ध्यायेत्सर्वविघ्नोपशान्तये ॥ १ ॥

अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः ॥

सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः ॥ २ ॥

गणानामधिपश्चण्डो गजवक्त्रस्त्रिलोचनः ॥

प्रसन्नो भव मे नित्य वरदातर्विनायक ॥ ३ ॥

सुमुखश्चैकदन्तश्च कपिलो गजकर्णकः ॥

लम्बोदरश्च विकटो विघ्ननाशो विनायकः ॥ ४ ॥

धुम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचन्द्रो गजाननः ॥

वक्रतुण्डः शूर्पकर्णो हेरम्बः स्कन्दपूर्वजः ॥ ५ ॥

☆

## श्री वासुदेवानंद सरस्वती कृत श्री गणपतिस्तोत्रम् ।

नमोगणपते तुभ्यं ज्येष्ठज्येष्ठाय ते नमः ।
स्मरणाद्यस्य ते विघ्ना न तिष्ठन्ति कदाचन ॥ १ ॥
देवानांचापि देवस्त्वं ज्येष्ठराज इति श्रुतः ।
त्यक्त्वा त्वा मिह कः कार्यसिद्धिं जंतुर्गमिष्यति ॥ २ ॥
सत्वं गणपतिः प्रीतो भवब्रम्हादिपूजित ।
चरण स्मरणात्तेपि स्युर्ब्रम्हाद्या यशस्विनः ॥ ३ ॥
परा परब्रम्हदाता सुराणां त्वं सुरो यतः ।
सन्मतिंदेहि मे ब्रम्हपते ब्रम्हसमीडित ॥ ४ ॥
उक्तंहस्तिमुखश्रुत्या त्वं ब्रम्ह परमित्यपि ।
कृतंवाहनमाखुस्ते कारणन्त्वत्र वेदनो ॥ ५ ॥
इयं महेश ते लीला नप स्पर्श यतो मतिः ।
त्वांनहेरम्ब कुत्रापि परंतन्त्रत्वमीश ते ॥ ६ ॥
स त्वंकवीनां च कविर्देवआद्यो गणेश्वरः ।
अरविंदाक्ष विद्येश प्रसंनःप्रार्थनां श्रुणु ॥ ७ ॥
त्वमेकदन्त विघ्नेश देवश्रृण्वर्भकोक्तिवत् ।
सत्कवीनां मध्य एव नैकाण्वश कविं कुरु ॥ ८ ॥
श्रीविनायक ते दृष्ट्या कोऽपिनूनं भवेत्कविः
तं त्वामुमासुतं नौमि सन्मतिप्रद कामद ॥ ९ ॥
ममापराधः क्षन्तव्यो नतिभिः संप्रसीद मे ।
नन मस्याविधिं जाने त्वं प्रसीदाद्य केवलं ॥ १० ॥
न मे श्रद्धा न मे भक्तिर्न त्व दर्चनपद्धतिः ।
ज्ञाता वदान्य ते स्मीति ब्रुवे साधनवर्जितः ॥ ११ ॥
कर्तुं स्तवंच तेनीशः प्रसीद कृपयोद्धर ।
प्रणामंकुर्वंऽतोऽनेन सदानंद प्रसीद मे ॥ १२ ॥

**इति श्रीवासुदेवानन्दसरस्वतीविरचितं गणपतिस्तोत्रं संपूर्णम्**

## श्रीमत् शंकराचार्य रचित

# श्रीगणपतिस्तोत्रम्

(श्रीमत् शंकराचार्यांनीं रचलेलें हे **श्रीगणपति स्तोत्रं** प्रथमदर्शनी कठीण वाटलें तरी तें अत्यंत सोपे, प्रासादिक तसेंच नादमधुर आणि नित्य पठणास सोपेच आहे. संस्कृत भाषेतील सन्धि-समास नियमानुसार सदरहु स्तोत्र छापलें जात असल्यामुळे तें क्लिष्ट भासते एवढेंच. विशेषतः ह्या स्तोत्रांत बहुतांश शब्द अनुस्वारांतिक असल्यामुळे हे स्तोत्र लयबद्ध (Rhythmic) वाटते. ह्या स्तोत्राच्या नित्य-पठणानें विघ्नहर गणेशाची कृपा सहजपणे संपादितां येते.—सं.)

सुवर्णवर्णसुन्दरं सितैकदन्तबन्धुरं
गृहीतपाशकांकुशं वरप्रदाभयप्रदम् ॥
चतुर्भुजं त्रिलोचनं भुजंगमोपवीतिनं ।
प्रफुल्लवारिजासनं भजामि सिन्धुराननम् ॥ १ ॥

किरीटहारकुण्डलं प्रदीप्तबाहुभूषणं
प्रचण्डरत्नकङ्कणं प्रशोभिताङ्घ्रियष्टिकम् ॥
प्रभातसूर्यसुन्दराम्बरद्वयप्रधारिणम् ।
सरत्नहेमनूपुरं प्रशोभिताङ्घ्रिपंकजम् ॥ २ ॥

सुवर्णदण्डमण्डितप्रचण्डचारुचामरं
गृहप्रतीर्णसुन्दरं युगक्षणं प्रमोदितम् ॥
कवीन्द्रचित्तरञ्जकं महाविपत्तिभञ्जकं
षडक्षरस्वरूपिणं भजेद्गजेन्द्ररूपिणम् ॥ ३ ॥

विरिञ्चिविष्णुवन्दितं विरूपलोचनस्तुतिं
गिरीश दर्शनेच्छया समर्पितं पराशया ॥
निरन्तरं सुरासुरैः सपुत्रवामलोचनैः
महामखेष्टमिष्टकर्मसु स्मृतं भजामि तुन्दिलम् ॥ ४ ॥
मदौघलुब्धचञ्चलार्कमुञ्जुगुञ्जितारवं
प्रबुद्धचित्तरञ्जकं प्रमोदकर्णचालकम् ॥
अनन्यभक्तिमानवं प्रचण्डमुक्तिदायकं
नमामि नित्यमादरेण वक्रतुण्डनायकम् ॥ ५ ॥
दारिद्र्यविद्रावणमाशु कामदम्
स्तोत्रं पठेदेतदजस्रमादरात् ॥
पुत्रीकलत्रस्वजनेषु मैत्री
पुमान्भवेदेक वरप्रसादात् ॥ ६ ॥

इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं श्रीगणपतिस्तोत्रं संपूर्णम् ॥


## भक्तियोग प्रकाशन सहर्ष जाहीर करीत आहे—

'गीतशिवायन,' 'कथा गोड शाहीर गाती रमा माधवाची,' इ. चे प्रासादिक रचनाकार—आकाशवाणीवर ज्यांच्या असंख्य गीतांना प्राधान्य मिळते असे भाविक कवि — मधुकर जोशी यांच्या

भावमधुर लेखणीची करामत

### " गीत महाभारत "

लवकरच विक्रीस उपलब्ध होत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
२०१०५०



# श्री गणपति अथर्वशीर्ष

॥ श्री ग णे शा य  न मः ॥

शांतिपाठ :

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥ १ ॥

ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः ।
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ॥
स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः ।
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ २ ॥

ॐ शांतिः ! शांतिः !! शांतिः !!!

अथ श्रीगणेशाथर्वशीर्ष व्याख्यास्यामः ॥

ॐ नमस्ते गणपतये ॥

त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि ॥

त्वमेव केवलं कर्ताऽसि ॥

त्वमेव केवलं धर्ताऽसि ॥

त्वमेव केवलं हर्ताऽसि ॥

त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि ॥

त्वं साक्षादात्माऽसि नित्यम् ॥ १ ॥

ऋतं वच्मि ॥ सत्यं वच्मि ॥ २ ॥

अव त्वं मां ॥ अव वक्तारम् ॥

अव श्रोतारं ॥ अव दातारम् ॥

अव धातारं ॥ अवानूचानमव शिष्यम् ॥

अव पश्चात्तात् ॥ अव पुरस्तात् ॥

अवोत्तरात्तात् ॥ अव दक्षिणात्तात् ॥

अवचोर्ध्वात्तात् ॥ अवाधरात्तात् ॥

सर्वतो मां पाहि पाहि समंतात् ॥ ३ ॥

त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः ॥
त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः ॥
त्वं सच्चिदानंदाऽद्वितीयोऽसि ॥
त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि ॥
त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ॥ ४ ॥

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते ॥
सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ॥
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति ॥
सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ॥
त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः ॥
त्वं चत्वारि वाक्पदानि ॥ ५ ॥
त्वं गुणत्रयातीतः ॥ त्वमवस्थात्रयातीतः ॥
त्वं देहत्रयातीतः ॥ त्वं कालत्रयातीतः ॥
त्वं मूलाधार स्थितोऽसि नित्यम् ॥
त्वं शक्तित्रयात्मकः ॥
त्वां योगिनो ध्यायंति नित्यम् ॥

त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं
रुद्रस्त्वं इंद्रस्त्वं अग्निस्त्वं
वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं
ब्रह्मभूर्भुवःस्वरोम् ॥ ६ ॥

गणादिं पूर्वमुच्चार्यवर्णादिं तदनंतरम् ॥
अनुस्वारः परतरः ॥ अर्धेन्दुलसितम् ॥
तारेण ऋद्धं ॥ एतत्तव मनुस्वरूपम् ॥
गकारः पूर्वरूपं ॥ अकारो मध्यमरूपम् ॥
अनुस्वारश्चान्त्यरूपं ॥ बिन्दुरुत्तररूपम् ॥
नादः संधानं ॥ सꣳहितासंधिः ॥
सैषा गणेशविद्या ॥ गणकऋषिः ॥
निचृद्गायत्रीच्छंदः ॥ गणपतिर्देवता ॥
ॐ गँ गणपतये नमः ॥ ७ ॥

एकदंताय विद्महे ॥
वक्रतुण्डाय धीमहि ॥
तन्नो दंती प्रचोदयात् ॥ ८ ॥

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् ॥
रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ॥
रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ॥
रक्तगंधानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपूजितम् ॥
भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम् ॥
आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम् ॥
एवं ध्यायति यो नित्यं
स योगी योगिनां वरः ॥ ९ ॥

नमो व्रातपतये । नमो गणपतये ।
नमः प्रमथपतये ।
नमस्तेऽस्तु लंबोदरायैकदंताय ।
विघ्ननाशिनेशिवसुताय ।
श्रीवरदमूर्तये नमो नमः ॥ १० ॥

एतदथर्वशीर्षं योऽधीते ॥
स ब्रह्मभूयाय कल्पते ॥
स सर्वतः सुखमेधते॥स सर्व विघ्नैर्नबाध्यते॥
स पञ्चमहापापात्प्रमुच्यते ॥
सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ॥
प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ॥
सायंप्रातः प्रयुंजानो अपापो भवति ॥
सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति ॥
धर्मार्थकाममोक्षं च विंदति ॥
इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् ॥
यो यदि मोहाद्दास्यति
स पापीयान् भवति ॥
सहस्रावर्तनात् यं यं काममधीते
तं तमनेन साधयेत् ॥ ११ ॥

अनेन गणपतिमभिषिंचति
स वाग्मी भवति ॥
चतुर्थ्यामनश्नन् जपति
स विद्यावान् भवति ॥
इत्यथर्वणवाक्यं ॥
ब्रह्माद्यावरणं विद्यात्
न बिभेति कदाचनेति ॥ १२ ॥
यो दूर्वांकुरैर्यजति
स वैश्रवणोपमो भवति ॥
यो लाजैर्यजति स यशोवान् भवति
स मेधावान् भवति ॥
यो मोदकसहस्रेण यजति
स वाञ्छित फलमवाप्नोति ॥
सः साज्यसमिद्भिर्यजति
स सर्वं लभते स सर्वं लभते ॥ १३ ॥

अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा
सूर्यवर्चस्वी भवति ॥
सूर्यगृहे महानद्यां प्रतिमासंनिधौ
वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति ॥
महाविघ्नात्प्रमुच्यते ॥ महादोषात्प्रमुच्यते ॥
महापापात् प्रमुच्यते ॥
स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति ॥
य एवं वेद इत्युपनिषद् ॥ १४ ॥
ॐ सहनाववतु ॥ सहनौभुनक्तु ॥
सह वीर्यं करवावहै ॥ तेजस्विना-
वधीतमस्तु मा विद्विषावहै ॥

☆

श्री गणपति अथर्वशीर्षाचा

# गेयानुवाद

रचयिते : डॉ. सीताराम गणेश देसाई, एम्. ए., पी. एच. डी.

## शांतिपाठ

देवानों ऐकावें मंगल । भद्र तेंचि कानानीं ।
मांगल्याचे दृष्य पहावें । सदैव अमुच्या नयनीं ॥१॥

देवानें जें कल्पित जीवन । स्तुती तयाची गात जगेन ।
धनशाली तो इन्द्र देव मम । पूषा करु दे जीवित जतन ॥२॥

गरुड करु दे पक्षी राज तो । संकट नाशन माझे त्वरित ।
बृहस्पतीही देवो संतत । बळ माझ्या या गात्रांत ॥३॥

शान्तिपाठ हा गाउनि केलें । गणपति देवा नमन ।
करितों आतां पुण्यप्रद हें । अथर्वशीर्षावर्तन ॥४॥

गणपती तुला नमस्कार । गणेशा तुला नमस्कार ॥धृ॥
ॐकाराचें रूप तत्व तूं । आत्मतत्त्व तूं जगकर्ता तूं ।
पालन करूनि विलया नेशी ।
असा चमत्कार ॥ गणेशा तुला नमस्कार ॥१॥
तूंच सर्व हें ब्रह्म खरोखर आत्मा साक्षात् तूचि निरंतर
भक्तरक्षणी असशी तत्पर सत्यपूर्ण उद्गार ॥२॥
असती माझे बोल यथार्थ त्रिकालांतही होती सार्थ
जगतांतिल तो तूं परमार्थ हाच खरा सुविचार ॥३॥
रक्षण करि तूं माझे संतत श्रोता वक्ता दाता भक्त
पूजा साधन दाता होतों ठेवी अभय कर ॥४॥

गुरुजवळी मी वेदाध्ययन करुनी झालो पवित्र पावन
तुझी पूजा करितो आता माझे रक्षण कर ॥५॥
विघ्ने येतिल जरी कुठोनी दशदिशांतुनी माझ्या जीवांनि
दूर करी ती त्वरित येउनी तुझ्यावरी हा भार ॥६॥
वाङमय चिन्मय सच्चित् तूची आनंदाची मूर्ति साची
एकमेव अद्वितीय तूंची तूंची ब्रह्म निर्धार ॥७॥
तुझ्यापासुनि हे ज्ञानमया जगताचा हा होय पसारा
तुझ्यांतुनी तो प्रकट होउनी तुझ्यांत लय होणार ॥८॥
विज्ञानमया सारे जीवन तुझ्या ठिकाणी येते परतुन
तूचि भूमि जल अग्नि वायुही आकाशा आधार ॥९॥
पश्यंती ती पराहि वाणी मध्यमा तशी वैखरी ज्ञणी
सृजिल्या चारी ज्यानें वाणी तूचि मूळ आधार ॥१०॥
सत्वरजांच्या तमोगुणाच्या अतीतरुपा गुणत्रयाच्या
स्थल सूक्ष्म आनंद अतीता गुणेश तूं साकार ॥११॥
मूलाधारीं वससी देहीं योगचक्र ते तुझेच पाही
योगी ध्याती नित्य तुलाही होई साक्षात्कार ॥१२॥
तूचि विधाता विष्णु तूचि रुद्र इंद्र अन् अग्निही तूची
वायू आणिक सूर्यहि तूची तूच चंद्र साकार ॥१३॥
भुर्भुवःस्वः याचि व्याहृति पृथ्वीवरती स्वर्गावरती
अंतरिक्ष पण थिटेचि होतें तूच सत्य ॐकार ॥१४॥
'ग' कार आधीं उच्चारोनी पुढें म्हणावा अकार वदनीं
अनुस्वार मग विलसे त्यांतूनी अर्ध चंद्र आकार ॥१५॥
तार नाम हे ॐकाराचें बीजमंत्र तव सहित तयाचे
आधीं उच्चारण प्रणवाचें मग मंत्रा उच्चार ॥१६॥

गणेशमंत्रातिल रहस्य हे 'ग' कार त्याच्या पूर्वी आहे
'अ' कार मध्यमरूपी आहे अन्ति अनुस्वार ॥१७॥
बिंदू येतो उत्तर रूपीं एकत्रित तो नाद स्वरूपीं
समुच्चयें मग मंत्रस्वरुपीं बीज नाम उच्चार ॥१८॥

गणेशविद्या गणक ऋषीनें निचृद्‌गायत्री छंदाने
गुंफुनि वाहिले प्रेमभराने गणेश हा आधार ॥१९॥

ॐ गँ गणपतये मम वंदन एकदन्त तो मनी जाणुन
वक्रतुंड मग ध्यानि सांठवुन मागतो प्रेरक बाल अनिवार ॥२०॥

एकदन्त प्रभु चार तू करी भग्नदंत अन् पाशांकुश धरि
वर देण्याला भक्तांवरि उचली एक कर ॥२१॥

मूषकवाहन मूषकध्वज तूं लाल कांति तव रक्त वस्त्र तूं
लंबोदर तुज लाल पुष्पें सदैव मी वाहणार ॥२२॥

लाल गंध तव तनुवरी लिंपुन भक्त करीती तुझेच पूजन
कृपा करुनी उद्धरिशी त्यां तूझें प्रेम अपार ॥२३॥

अच्युत तूही जगत्कारण सृष्टीपूर्वी तुझेच जीवन
पुरुष प्रकृतिहूनि तू भिन्न रूप तुझे अविकार ॥२४॥

असे तुला जे नित्यहि ध्याती योग्यांतहि ते श्रेष्ठचि होती
व्रातपतीला प्रमथपतीला करूं नमस्कार ॥२५॥

लंबोदर तूं एकदंत तूं विघ्नांतक तूं शिवनंदन तूं
वरदमूर्ति तूं गजानना तूज प्रणाम हा शतवार ॥२६॥

## फलश्रुति

अथर्वशीर्षाचे अध्ययन करितां होई सुख लाभ धन
सर्व ठिकाणी ब्रह्मरूप मन विघ्नें जाती दूर ॥२७॥

पंडितहत्या सुरापान करि गुरुस्त्रीरती सुवर्णचोरी
ऐशी कर्मे करितो त्याचा संगहि घातक फार ॥२८॥

पंचमहापातकें हीं अशीं त्यांतुनि मुक्ति होय त्वरितशी
सायंकाळी पठण करीता दिनपातक हो दूर ॥२९॥

प्रातःकाळी जरि करि पठण रात्रिपातकें होती निरसन
सायंप्रातःकरिता मनन अपाप होइ नर ॥३०॥

सर्व ठिकाणी करितां पठण विघ्नांपासुनि होतें रक्षण
पुरुषार्थाचा लाभ होउन खुलते मोक्षद्वार ॥३१॥

श्रद्धा अथवा आदर नसला शिकवुं नये तर हे शिष्याला
मोहाने जर शिकवी तयाला पापी होई फार ॥३२॥

हजारवेळां करिता पठण होती साऱ्या इच्छा पूर्ण
अभिषेकाने वाग्मी होउन मोहोवितो जगभर ॥३३॥

चतुर्थितिथिला करि उपवास विद्याप्राप्ति होई त्यास
अथर्वणाचे वाक्य असे हें सत्य सदा निर्धार ॥३४॥

ब्रह्म मायेचे आवरण नीट जाणुनि करी जो मनन
भीति नसे त्या कुठेही जाण निर्भय सदैव शूर ॥३५॥

दुर्वांकुरसाधनें गणेशा हवन करीती जे परमेशा
कुबेरापरी धनवान् होऊनि सदा सुखी होणार ॥३६॥

लाह्या हवनी कोणी अर्पितो यशवंत जगीं बुद्धिमंत हो
हजार मोदक होमी अर्पुन वांछित फल मिळणार ॥३७॥

तूप माखिल्या समिधा हवनीं अर्पण करिता मिळे जीवनीं
सुख सारे अन् सर्वहि आशा होई लाभ अपार ॥३८॥

आठ ब्राह्मणा दीक्षा देता अथर्वशिर हें योग्य शिकवतां
सूर्यासम तेजाची प्राप्ती होईल त्या निर्धार ॥३९॥

रविग्रहण ज्या दिनीं असेल महानद्यांच्या पुण्य तिरांवर
गणेश मूर्तीसमीप जप करी मंत्र तदा साकार ॥४०॥
जप कर्त्याला मिळते मुक्ति महान विघ्नें विनष्ट होती
महा दोषही विलया जाती पापांचा संहार ॥४१॥
जाणितसे जो परम पवित्र अथर्वशिर तो होई पात्र
सर्व ज्ञानी सर्व अनुभवी गणेश हा आधार ॥४२॥
संपलें इथें हे बोधयुत गणेशप्रभुचें उपनिषदामृत
गुरुशिष्यांचें रक्षण करुनी दोघांचा उद्धार ॥४३॥
दोघांनी करू सह पराक्रम तेजस्वी करी गणेशनाम
द्वेष कदाहीं मनी न ठेवूं शांति सुखा ना पार ॥४४॥

---

## विशेष सूचना

(१) अथर्वशीर्षाचे सरळ मराठी गद्य भाषांतर परिशिष्ट 'अ' मध्ये वाचा.

(२) मधुकर जोशी रचित 'अथर्वशीर्ष गीत माला' श्रीगणेश गीतांजलींत वाचा.

(३) अथर्वशीर्षाचा मराठी श्लोकानुवाद परिशिष्ट 'ब' मध्ये वाचा.

---

# श्री गणपति भक्तिदर्शन

आपल्या संग्रही हवेच !

---

# ॐ श्री गणेश नामावलि



१. ॐ अघनाशनाय नमः
२. ॐ अनामयाय नमः
३. ॐ अनुकूलाय नमः
४. ॐ अनंताय नमः
५. ॐ अमितविक्रमाय नमः
६. ॐ अमेयात्मने नमः
७. ॐ अमेयाय नमः
८. ॐ अमोघविक्रमाय नमः
९. ॐ अव्यग्राय नमः
१०. ॐ आखुवाहनाय नमः
११. ॐ आनंदाय नमः
१२. ॐ आपद्धंत्रे नमः
१३. ॐ इभवक्त्राय नमः

१४. ॐ ईशपुत्राय नमः
१५. ॐ उग्राय नमः
१६. ॐ उर्ध्वरेतसे नमः
१७. ॐ उमापुत्राय नमः
१८. ॐ एकदंताय नमः
१९. ॐ कपिलाय नमः
२०. ॐ कमलाक्षाय नमः
२१. ॐ करुणाय नमः
२२. ॐ कामदाय नमः
२३. ॐ कामपोक्षिणे नमः
२४. ॐ कामरूपिणे नमः
२५. ॐ कामारिसुनवे नमः
२६. ॐ कांतिदाय नमः
२७. ॐ कुमारगुरवे नमः
२८. ॐ गजकर्णाय नमः
२९. ॐ गजदंताय नमः
३०. ॐ गजवक्त्राय नमः
३१. ॐ गजाननाय नमः
३२. ॐ गजास्याय नमः
३३. ॐ गणनायकाय नमः
३४. ॐ गणाधिपतये नमः
३५. ॐ गणाधिपाय नमः
३६. ॐ गणेशाय नमः
३७. ॐ गणेश्वराय नमः
३८. ॐ गौरीसुताय नमः
३९. ॐ गुहाग्रजाय नमः

४०. ॐ चतुर्भुजाय नमः
४१. ॐ चित्तेश्वराय नमः
४२. ॐ जगत्प्रभवे नमः
४३. ॐ जगन्मायाय नमः
४४. ॐ ज्योतिस्वरूपाय नमः
४५. ॐ ढुंढिराजाय नमः
४६. ॐ दिव्यपादाब्जाय नमः
४७. ॐ दीर्घतुंडाय नमः
४८. ॐ दुर्धर्षाय नमः
४९. ॐ धूम्रकेतवे नमः
५०. ॐ नागयज्ञोपवीतिने नमः
५१. ॐ नित्याय नमः
५२. ॐ निर्मलाय नमः
५३. ॐ परमाय नमः
५४. ॐ पाशहस्ताय नमः
५५. ॐ पुण्याय नमः
५६. ॐ प्रथमपूजिताय नमः
५७. ॐ प्रियाय नमः
५८. ॐ बटवे नमः
५९. ॐ भक्तकल्याणाय नमः
६०. ॐ भक्तमंदराय नमः
६१. ॐ भालचंद्राय नमः
६२. ॐ भूतात्मने नमः
६३. ॐ भीमोदराय नमः

६४. ॐ महागणपतये नमः
६५. ॐ मणिकुंडलमंडिताय नमः
६६. ॐ महाग्रीवाय नमः
६७. ॐ महाबाहवे नमः
६८. ॐ मूषकाधिपवाहनाय नमः
६९. ॐ मोहवर्जिताय नमः
७०. ॐ योगधाम्ने नमः
७१. ॐ योगीशाय नमः
७२. ॐ रत्नसिंहासनाय नमः
७३. ॐ लीलासेविताय नमः
७४. ॐ लंबोदराय नमः
७५. ॐ वक्रतुंडाय नमः
७६. ॐ विकटाय नमः
७७. ॐ विगतज्वराय नमः
७८. ॐ विभवे नमः
७९. ॐ विनायकाय नमः
८०. ॐ विघ्नेशाय नमः
८१. ॐ विघ्नांधकाराय नमः
८२. ॐ विद्यानिधये नमः
८३. ॐ विश्वचक्षुषे नमः
८४. ॐ विश्वमूर्तये नमः
८५. ॐ विश्वधात्रे नमः
८६. ॐ विश्वधाराय नमः
८७. ॐ विश्ववरदाय नमः
८८. ॐ वेदवेद्याय नमः
८९. ॐ वेदस्तुताय नमः

९०. ॐ सनातनाय नमः
९१. ॐ सर्वगाय नमः
९२. ॐ सर्वज्ञाय नमः
९३. ॐ सर्वसिद्धिप्रदायकाय नमः
९४. ॐ सर्वात्मने नमः
९५. ॐ सहस्त्रशीर्ष्णे नमः
९६. ॐ सामगाय नमः
९७. ॐ सिद्धवेदाय नमः
९८. ॐ सिद्धसेनाय नमः
९९. ॐ सिंदुरवरदाय नमः
१००. ॐ सुमुखाय नमः
१०१. ॐ सुराग्रजाय नमः
१०२. ॐ सुराधिशाय नमः
१०३. ॐ स्कंदाग्रजाय नमः
१०४. ॐ स्थूलकर्णाय नमः
१०५. ॐ हरसूनवे नमः
१०६. ॐ हिरण्यरूपाय नमः
१०७. ॐ हेरंबाय नमः
१०८. ॐ ज्ञानरूपाय नमः

☆



# श्रीगणपतीची व्रते : (१) विनायकी

प्रत्येक महिन्यांतील शुक्लपक्षांत जी चतुर्थी येते तिला **विनायकी चतुर्थी** म्हणतात. पंचागांतही तसा उल्लेख त्या तिथीसमोर असतो. संकष्टीप्रमाणेच हे व्रत करतात. मात्र सबंध दिवस उपवास करून दुसऱ्या दिवशी पारणें करण्याचा प्रघात आहे. **या पूजेला चंद्रदर्शनाची जरुरी नसते.** गणपतीला नवस करून ७, ११, २१ अशा विनायक्या नियमाने कराव्यात. **मंगळवारी येणाऱ्या विनायकी चतुर्थीलाच अंगारकी विनायकी म्हणतात.** त्या

दिवशी व्रत केल्यास, २१ विनायकी व्रते केल्याचे पुण्य लाभते. संकष्टीच्या पूजेप्रमाणेच सर्व मंत्र म्हणावे व पूजा करावी. फक्त षोडशोपचार अर्पण करतांना 'संकष्टहर गणपती'च्या ऐवजी, 'सिद्धिविनायकाय नमः' असा नामनिर्देश करावा.

## (२) संकष्टि

संकट चतुर्थी, संकष्ट चतुर्थी किंवा संकष्टि चतुर्थी ह्या विविध नावांनी प्रसिद्ध असलेले हे व्रत दर महिन्याच्या वद्य म्हणजे दुसऱ्या पंधरवड्यातील चतुर्थीला करावे. त्या दिवशी सबंध दिवस उपोषण करून रात्री श्रीसंकष्टहर गणपतीची पूजा करून, गणपतिअथर्वशीर्षाची किमान २१ आवर्तने म्हणून नैवेद्य दाखवावा, आणि चंद्राचे दर्शन घेऊन उपोषण सोडावे. कोणत्याही संकटाचा परिहार करण्यासाठी हे व्रत करतात. मंगळवारी येणाऱ्या वद्य चतुर्थीलाच अंगारिका संकष्टि म्हणतात. चंद्रदर्शन करून चंद्राचे पूजन करणे आणि नंतर पारणे करणे ह्याला ह्या व्रतांत अत्यंत महत्व आहे.

संध्याकाळी स्नान वगैरे करून शुचिर्भूत होऊन पूजेची सर्व तयारी करावी. नंतर पूजास्थानी आपल्या देवांत गणपतीची एखाद्या तांब्या पितळेची किंवा सोन्या चांदीची मूर्ति असल्यास तिचीच पूजा करावी. नसली तर एक सुपारी घेऊन तिलाच गणपति समजून त्या सुपारीची पाटावर स्थापना करून नेहमीप्रमाणे षोडशोपचार पूजा करावी. व नंतर "श्रीसंकष्टहर गणपतयेनमः!" असा उच्चार करावा.

### संकल्पाचा मंत्र

"मम सकलारिष्टशांत्यर्थं, समस्तविघ्न निवारणार्थ विद्या धन

पुत्रपौत्रादिप्राप्यर्थं समस्तरोग मुक्तिकामः श्रीसंकष्टहर गणपति प्रीत्यर्थं संकष्ट चतुर्थी व्रतांगत्वेन यथाशक्ति पूजां करिष्ये।'

## ध्यानमंत्र

'लंबोदर चतुर्बाहुं त्रिनेत्रं रक्तवर्णकम्।
नानारत्नैः सुवेषाढ्यं प्रसन्नास्यं विचिंतये॥'

## चंद्रपूजेचा मंत्र

दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णव संभवम्
नमामि शशिनं सोमं शंभोर्मुकुट भूषणम्॥

## विसर्जन मंत्र

'गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ स्वस्थाने त्वं गणेश्वर।
व्रतेनानेन देवेश यथोक्तफलदो भव॥'

## संकष्टि व्रत फलप्राप्तीचा अनुभव

पूर्वी कार्तिकेयाच्या प्राप्तीसाठी पार्वतीने, समुद्राचे प्राशन करण्यापूर्वी अगस्तीने, नलाचा शोध लागेना तेव्हा दमयंतीने, उषेची मैत्रिण चित्रलेखा हिने अनिरुद्धाला पळवून नेले होते तेव्हा, रुक्मिणीच्या आज्ञेवरून प्रद्युम्नाने आणि शनिपीडा दूर होण्यासाठी दशरथराजाने ह्या व्रताचे अनुष्ठान करून इच्छित गोष्टी साध्य करून घेतल्या होत्या.

विद्यमान काळीही अनेक विवाहेच्छुकांनी संकष्टीच्या व्रताचा अंगिकार करून इष्ट फलप्राप्ति साध्य करून घेतली आहे.

## ( ३ ) मनकामनापूर्तिकारक श्रीगणेशव्रत

कोणत्याही शुभ दिवशी शुभ मुहूर्तावर ह्या व्रताचा प्रारंभ करावा. प्रथम नेहमीप्रमाणे पूजा करून संकल्प करावा.

**जे विशिष्ट संकट दूर व्हावयाला हवे असेल त्याचा स्पष्ट उल्लेख त्या संकल्पात करावा.**

**एकवीस दिवस** करावयाचे हे व्रत आहे.

पहिल्या दिवशी घरातील, श्रीगणपतीपुढे नारळ ठेवावा. हा नारळ व्रतसमाप्तीचे दिवशी फोडायचा आणि त्याची शेरणी प्रसाद म्हणून वाटावयाची.

**नित्यक्रम** :—दररोज पूजा करणे, गूळ, खोबऱ्याचा नैवेद्य दाखविणे. खारीक, दोन पाने व १ सुपारी असा विडा देवासमोर ठेवून त्यावर पाच पैसे दक्षिणा ठेवणे. असे दररोज एकवीस दिवस करावे.

**संकट हरण श्री गणेशव्रत**

(१) **आवाहन** :—२१ न मोडके तांदुळ म्हणजे अक्षता न भिजविता घ्यावे आणि गणपति अथर्वशीर्षाची २१ आवर्तने म्हणावीत **प्रत्येक आवर्तनाच्या प्रारंभी आणि आवर्तन संपल्यानंतर ‘ॐ गँ गणपतये नमः।’** हा मंत्र म्हणावा. अथर्वशीर्षाची फलश्रुति दैनिक उपासनेच्या शेवटी एकदाच म्हणावी. प्रत्येक आवर्तन संपल्यानंतर एक तांदूळदाणा श्री गणपतीच्या मूर्तिवर किंवा नर्मद्या गणपति असला तर त्यावर वहावा. अशा रितीने एकवीस आवर्तनांना प्रत्येकी एक असे हे एकवीस तांदूळ वापरायचे.

(२) **अभिषेक** :—श्री ची मूर्ती किंवा नर्मद्या गणपति ताम्हनांत ठेवून त्याला पंचामृत वाहावे आणि अभिषेक पात्रात पाणी ओतून त्यावर २१ आवर्तने म्हणेपर्यंत अभिषेक करीत रहावा.

(३) **आसन** :—प्रत्येक आवर्तनानंतर एक दुर्वांकुर समोरील पाटावर मांडावा. अशा रीतीने २१ दूर्वांकुरांचे आसन स्थापन केल्यावर—

(४) **स्थापना अथवा दूर्वार्पण** :—गणपति पुसून त्या दूर्वांच्या

आसनावर ठेवावा. नंतर त्याची पुन्हा पूजा करावी आणि एका आवर्तनानंतर एक दूर्वांकुर असे २१ दूर्वांकुर वहावे.

(५) **मंगलाक्षता अर्पण** :—पांचव्या वेळी विडा ८ किंवा गुलाल-मिश्रित २१ अखण्ड तांदूळ न भिजविता घेऊन प्रत्येक आवर्तनानंतर एक असे गणपतीला वहावेत व नंतर प्रसाद व नैवेद्य दाखवावा.

**सूचना** :—ह्या व्रतात एकूण २१ दिवसात, प्रत्येकी २१ × ५ = १०५ आवर्तने होतात. म्हणजे एकूण आवर्तने १०५ × २१ = २२०५ आवर्तने म्हणून होतात. दररोज तीन चार तास लागतात.

ह्या एकवीस दिवसांत ज्या दिवशी शक्य होईल त्या दिवशी **निदान एक दिवस तरी** रक्तवर्ण फळाचा (डाळिंब, सफरचंद वगैरेचा) नैवेद्य दाखवावा. व ब्राह्मणाला ते फळ अर्पण करावे. तसेच **निदान एक दिवस तरी ब्राह्मणाला लाह्या व दूध देणे.** हे एकवीस दिवस **उपवास करावा असे बंधन नाही.** अर्थात २१ दिवस मध्ये खंड पडता कामा नये. हे व्रत गुरुजीकडून करून घेतले तरी चालते. दररोजच्या पांच एकादशिन्या २१ × ५ = १०५ आवर्तने होतात. म्हणजे २१ दिवसात १०५ एकादशिन्या होणार. त्याप्रमाणे गुरुजींना द्याव्या लागणाऱ्या दक्षिणेचा अंदाज येईल. **एवढा खर्च करावयाचा नसेल तर स्वतःच ही आवर्तने म्हणावीत.**

**समाप्ति** :—रोज गुरूजींमार्फत हे व्रत केल्यास त्यांना यथाशक्ति दक्षिणा देणे. समाप्तीच्या दिवशी उपवस्त्र म्हणजे उपरणे देऊन ब्राह्मणाला महादक्षिणा यथाशक्ति द्यावी.

मागे सांगितल्याप्रमाणे समाप्तीच्या दिवशी, पहिल्या दिवशी देवापुढे ठेवलेला नारळ फोडावा व प्रसाद म्हणून तोच वाटावा. समाप्तीच्या दिवशी शक्य असल्यास २१ ब्राह्मणांना नाहीतर **एका तरी** ब्राह्मणाला भोजनाला बोलावून यथाशक्ति भोजन-दक्षिणा देऊन ह्या व्रताची सांगता करावी.

**ह्या श्रीगणेश व्रताचे अनुष्ठान कोणी वाचकाने केले तर त्याला आलेले अनुभव त्याने भक्तियोग प्रकाशनला जरूर कळवावेत ही विनंति. पुढील आवृत्तीत त्या अनुभवांचा उल्लेख करता यावा हा या आवाहनामागील हेतु.**

## ( ४ ) श्री गणेशचतुर्थीचे व्रत

भाद्रपद शुक्ल चतुर्थीचे दिवशी सकाळी स्नान करून आपल्या गुरूकडे जावे. त्याची अर्घ्यपाद्यादिकांनी पूजा करून आणि त्याच्या ठिकाणी गजाननांची भावना धरून व्रताचा उपदेश मागावा. गुरुमुखातून व्रत समजून घेऊन तळे, देवळाजवळचा जलाशय वगैरे पवित्र जागी जाऊन अंगाला आवळयाचे किंवा तिळाचे चूर्ण लावून स्नांन करावे. संध्यावंदनादि नित्य कर्मे करावी आणि गणपतीचे पूजन करावे. श्रावण शुद्ध चतुर्थी पासून भाद्रपद शुद्ध चतुर्थीपर्यंत ब्रह्मचर्यव्रताने रहावे. उपवास एकभुक्त, नक्त किंवा अयाचित वृत्तीने किंवा दिवसाच्या चवथ्या भागांत हविष्यान्नाचे भोजन करावे, षडक्षर, चतुरक्षर, द्वयक्षर, एकाक्षर, दशाक्षर, किंवा द्वादशाक्षर यापैकी ज्याचा गुरुकडून उपदेश घेतला असेल त्या मंत्राचा लक्ष किंवा दशसहस्त्र जप करावा किंवा त्याचे निम्मे करावा. अहोरात्र गजाननाचे ध्यान करावे. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला चार तोळे किंवा दोन तोळे सुवर्ण घेऊन त्याची मोरावर किंवा उंदरावर आरूढ झालेली सुंदर गणेश प्रतिमा करावी. सुंदर मखरात धान्याच्या राशीवर, सोन्याचा, रुप्याचा किंवा तांब्याचा कलश ठेवून त्याच धातूचे पूर्ण पात्र ठेवावे. त्यांत पंचपल्लव पंचरत्ने घालून त्याच कलशाभोवती वस्त्राचे वेष्टन करावे. नंतर पाठपूजा करून, त्या कलशावर प्रतिमेची स्थापना करावी. नंतर होम करावा. अनेक द्रव्यांच्या आहुती देऊन आचार्य पूजन करावे. गोदान, भूदान, सुवर्ण व तीलदान इत्यादि दाने गुरुला द्यावींत. इतर ब्राह्मणांनाही दक्षिणा द्यावी. एकशे आठ ब्राह्मणांना किंवा एकवीस ब्राह्मणांना भोजन द्यावे. दीन, आंधळे, दरीद्रि यांना अन्न व खीर घालावी. पुनः भोजन व दक्षिणा देऊन ब्राह्मणांचे आशीर्वाद घ्यावेत नंतर आतेष्टांसह भोजन करताना मौन पाळावे. अशा रितीने हे व्रत केले असतां भुक्तिमुक्ति प्राप्त होतात.

# दूर्वा माहात्म्य

## (श्रीगणेशपुराणातून उद्धृत)

पूर्वी स्थावर नावाच्या नगरासमीप **कौंडिण्य** नावाचा ऋषि राहात असे. त्यांच्या आश्रमाजवळ एक सरोवर होते. कौंडिण्याने त्या ठिकाणी गजाननाची एक चतुर्भुज मूर्ति स्थापन करून तिची प्रार्थना आरंभली. तो रोज गणपतीला पुष्कळ दूर्वा वहात असे. एके दिवशी त्याची पत्नी **आश्रया** त्याला म्हणाली, 'गणपतीला दूर्वा का आवडतात?' तेव्हा कौंडिण्य म्हणाले, 'प्रिये ऐक. पूर्वी एकदा यम नगरीत मोठा उत्सव झाला. त्यावेळी देवगंधर्वादि सर्व आले होते. त्यावेळी तिलोत्तमा नृत्य करू लागताच यमराज काम-विव्हळ झाले व तत्परिणामी अनलासुर नांवाचा एक भयंकर राक्षस निर्माण झाला. त्या अनलासुर राक्षसाच्या दारुण स्वराने त्रिभुवन त्रस्त झाले. याच्या नेत्रातील अग्नीने पृथ्वी जळू लागली तेव्हा सर्व देव भयभीत होऊन त्यांनी **गणपतीची** स्तुति केली. गजानन बालरूपाने प्रकट झाले. तेवढ्यात **अनलासुर** दशदिश जाळीत पोळीत तेथे आला. तेव्हा **गजाननाने** त्याला गिळून टाकले. आणि पोटात साठविले. प्रत्यक्ष अग्निरूप राक्षसाला उदरात स्थान दिल्यामुळे गजाननाच्या शरीराचा दाह होऊ लागला. तेव्हा इंद्रादि देव त्यावर शीतलोपचार करू लागले. इंद्राने शीतल व अमृतमय चंद्र त्याच्या मस्तकावर ठेवला. म्हणून त्याला **भालचंद्र** नाव प्राप्त झाले. ब्रह्मदेवाने सिद्धि आणि बुद्धि या आपल्या दोन मानसकन्या त्याला अर्पण केल्या. विष्णूने आंपल्या हातातले थंडगार कमळ त्याला दिले त्यामुळे त्याला **'पद्मपाणी'** नाव पडले. वरुणाने थंडगार पाण्याचा अभिषेक त्या बालमूर्तींवर केला. परंतु तेवढ्यानेही **गजाननाचा** दाह शांत झाला नाही. तेव्हां शंकरांनी सहस्त्र मस्तकांचा नाग

त्याला अर्पण केला. त्यामुळे गजाननालाही **व्यालबद्धोदर** असे नाव प्राप्त झाले. सरते शेवटी ८८ हजार मुनीनी प्रत्येकी एक अशा हिरव्यागार दुर्वा गजाननाच्या मस्तकावर वाहिल्या. तेव्हा मात्र गजाननाच्या शरीराचा दाह शांत झाला. तेव्हा गजानन म्हणाले, 'अनेक उपायांनी माझ्या शरीराचा दाह शमला नाही, तो दूर्वांनी शमला म्हणून आजपासून या दूर्वा माझ्या प्रिय आहेत. त्या मला अर्पण करणाराला हजारो यज्ञयाग, व्रते, दाने व तीर्थे केल्याचे पुण्य लाभेल.' 'कालानलप्रशमन' गणपतीच्या स्मरणार्थ देवांनी त्या ठिकाणी सुंदर देऊळ बांधले व 'विघ्नहर' गजाननाची तेथे स्थापना केली.

## दूर्वा वाहताना म्हणावयाचे मंत्र

**गणपतीला दूर्वा वाहताना पुढील एकवीस नांवाचा उच्चार करावा.**

प्रत्येक नावाच्या उच्चारापूर्वी ' ॐ ' उच्चारावाच.

**गणाधिपाय नमः। उमापुत्राय नमः।**
**अभयप्रदाय नमः। एकदंताय नमः।**
**इभवक्त्राय नमः। मूषकवाहनाय नमः।**
**विनायकाय नमः। ईशपुत्राय नमः।**
**सर्वसिद्धिप्रदायकाय नमः। लंबोदराय नमः।**
**वक्रतुंडाय नमः। अघनाशनाय नमः।**
**विघ्नविध्वंसकर्ते नमः। विश्ववंद्याय नमः।**
**अमरेश्वराय नमः। गजवक्त्राय नमः।**
**नागयज्ञोपवीतिने नमः। भालचंद्राय नमः।**
**परशुधारिणे नमः। विघ्नाधिपाय नमः।**

**गँ गणपतये नमः**

# मंत्रोपासना : श्रीगणेशाचे लाभदायी मंत्र

श्री गजाननाला प्रसन्न करून घेण्याचे जे **अनेक** मंत्र आहेत त्यांत **सात कोटी महामंत्र सांगितलेले आहेत.** त्या सर्वांत षडाक्षर **ॐ गँ गणपतये** आणि एकाक्षर मंत्र '**ॐ श्री गँ**' श्रेष्ठ आहेत. या दोन मंत्रांनी सर्व सिद्धि प्राप्त होतात. या मंत्राचे अनुष्ठान करणाराने स्नान करून, श्वेत वस्त्र नेसावे. नंतर दर्भाच्या किंवा दुसऱ्या **मातृका** बहिर्मातृकापूर्वक न्यास करावा. श्री गजाननाच्या आपादमस्तक स्वरूपाचे ध्यान करून त्याची मानस पूजा करावी त्यानंतर गजानन प्रसन्न होईपर्यंत पुरश्चरण करण्याचा संकल्प करावा. एकाक्षर मंत्राचा एक लक्ष किंवा अर्धा लक्ष जप करावा. षड्क्षर मंत्राचा एक लक्ष किंवा अर्धा लक्ष जप करावा. तसेच पंचाक्षर आणि अष्टाक्षर मंत्राचा लक्ष किंवा दशलक्ष जप करावा. **शुद्ध चतुर्थीला जपाला आरंभ करून एक महिना अनुष्ठान केल्याने मनकामना पूर्ण होईल.**

## विघ्नेशमाला मंत्र


ॐ नमो गणपते महावीर दशभुज मदनकालविनाशन मृत्युं हन हन, कालं संहर संहर धमधम मथमथ त्रैलोक्यं मोहय मोहय ब्रह्माविष्णुरुद्रान्मोहय मोहय, अचिन्त्यबलपराक्रम सर्वे व्याधीन् विनाशय विनाशय सर्वग्रहान चूर्णय चूर्णय, नागान्मोटय मोटय, त्रिभुवनेश्वर सर्वतोमुख हुं फट् स्वाहा ॥

( ह्या मंत्राच्या जपाने रोग बरे होतात. )

## साक्षात्कारदर्शन मंत्र

**ॐ गँ गणपतये नमः ॐ श्रीं गँ**

# श्रीगणेश गीतांजलि



—श्री. मधुकर जोशी

—डॉ. सीताराम ग. देसाई

—श्री. उमाकांत कीर

# गणेशा, दुर्वांकुर वाहतो

नमो गणपति तूंच अधिपति देवा तुज नमितो
गणेशा, दुर्वांकुर वाहतो ॥ धृ ॥
गणाधिप रे तू गणराया
विनायक तू देई छाया
वक्रतुंड तूं लंबोदर रे दुःख दूर करितो ॥ १ ॥
गुहाग्रजा रे चित्तेश्वर तूं
तुझे अनंता अनंत हेतू
गौरीसूता रे कामदाय तू विद्या मज देतो ॥ २ ॥
आनंदानया आनंद देई
प्रियारे जगतां प्रिय तूं होई
भालचंद्र तू चंद्रकिरण रे सौख्याचे अर्पितो ॥ ३ ॥
योगीश रे तूं योगीजनांचा–
भूतात्मना तूं सकल जणांचा–
चिंतामणी हे उग्राया तूं करूणा तूज भाकितो ॥ ४ ॥
कुमारगुरवे गजकर्णाया—
तुझी अलौकीक आहे माया
वरदहस्त हा सदा असू दे हेच तुला प्रार्थितो ॥ ५ ॥

— मधुकर जोशी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्वामित्व

# श्री गणपतीची भूपाळी

विघ्न विनेशा हे गणधीशा गजानना गणपति
ऊठ गणेशा दारीं तुझ्या या भक्त तुझे तिष्ठति ॥ धृ ॥
मंदिरात या सनई वाजे वाजतसे चौघडा
विनायका ही नयने अपुली हलके हो उघडा
फुलाफुलातून दंवबिंदु हे मोदे बघ नाचति ॥ १ ॥
गजर होतसे अखंड येथे तुझिया नामाचा
हृदया हृदयातून दरवळे सुगंध भक्तीचा
दूर्वा आणिक फुले वाहुनी करती जन आरती ॥ २ ॥
तव नामाने विघ्ने विरती—सरती ते क्लेश
सकल कलांचा तूं शास्त्राचा अससी जगदीश
व्यास महर्षि, मुनी वाल्मिकी कवि तुला वंदिती ॥ ३ ॥

—मधुकर जोशी

भक्तियोग प्रकाशनची

संकल्पित

"२१ श्रीगणेश स्थाने" माला

लवकरच सुरू होत आहे.

# अथर्वशीर्ष गीत माला

रचयिता : कवि मधुकर जोशी, 'गीतशिवायन' कार

अथर्वशीर्ष गीतमाला — गीत १

## शांतिपाठ स्तवन

यज्ञीय देवतांनो– शुभ ऐकू द्या आम्हाला
हित चांगले बघू द्या या लोचनी आम्हाला ॥ धृ ॥
बलवान हे सुखाचे आयुष्य जे मिळाले
ते सर्व ईश्वराच्या चरणींच अर्पिलेले
ध्याऊ तसेच गाऊ मन एक ईश्वराला ॥ १ ॥
यशवान इंद्र आमुचे कल्याण हे करू द्या
तो सूर्य ज्ञानवान हित आमुचे करू द्या
वाहू विचार सुमने प्रभुनाम कीर्तनाला ॥ २ ॥
रथ दूर दूर नेता दैत्यास काळ भासे
करी क्षेम जो गरूड आम्हास देव भासे
बुद्धि बृहस्पतिही शुभ देवू द्या आम्हाला ॥ ३ ॥

*


भक्तियोग प्रकाशनच्या विद्यमाने

लवकरच प्रकाशित होत आहे–

कवि : मधुकर जोशी रचित

गीतमहाभारत

अथर्वशीर्ष गीतमाला — गीत २

## गणेशा देव तूच साक्षात्

अथर्वशीर्ष हे ऋषी सांगति जोडून दोन्ही हात
गणेशा देव तूंच साक्षात् ।। धृ ।।
तूं दुष्टांचा नाश कराया घेशी अवतार
भक्त जनांचा तूंच एकला असशी आधार
दैवत अमुचे तूंच गणेशा कृपा करी निमिषात ।। १ ।।
सर्वव्यापी तूं ब्रह्मचि असशी—तसाच अविनाशी
आत्मस्वरूपी तूंच एकला हृदयी रहिवासी
सत्य सांगतो सत्य बोलतो—सत्य असे ओठात ।। २ ।।

अथर्वशीर्ष गीतमाला — गीत ३

## प्रभो मी त्रिवार तुज वंदितो

रक्षण माझे करी गणेशा चरणी तव प्रार्थितो
प्रभो मी त्रिवार तुज वंदितो ।। धृ ।।
तुझ्या रुपाचे वर्णन करतो सद्‌गुणचि ऐकतो
रक्षण कर रे विघ्नापासून हेंच तुला विनवितो ।। १ ।।
उपासनेची तुझ्या साधने उत्पन्नचि करितो
गुरुजवळी मी शिकतांनाही वेदांनी स्तवितो ।। २ ।।
शिष्य तुझा मी रक्षण कर रे देवा मी विनवितो
तव चरणी हे मस्तक माझे शतदा रे टेकितो ।। ३ ।।
पूर्वा पश्चिम दक्षिण उत्तर दिशातूनि पाहतो
आसमंत या अवांतरातून धावा तव करितो ।। ४ ।।

अथर्वशीर्ष गीतमाला — गीत ४

## गणेशा वेद तुला स्तविती

आनंदाचा कंद प्रभो हा आहे हो गणपति
गणेशा वेद तुला स्तविती ।। धृ ।।
वाणी स्वरूपी असती तूं जर जीव स्वरूपी असे
ब्रह्मरूप तूं आनंदाचा चराचरावर दिसे
सत्‌चित् आनंदाचि दिसते प्रभो तुझी मूर्ति ।। १ ।।
तुझ्या सारखा तूंच खरोखर अन्य कुणी नाही—
ब्रह्म ज्ञानमय विज्ञानाचा तूं ज्ञाता राही
तुला पाहता कर हे माझे भक्तीने जुळती ।। २ ।।
तूच निर्मिसी जग हे सारे तुझ्यामुळे टिकते
तुझ्या ठिकाणी जग हे सारे तुझ्यामुळे टिकते
तुझ्या ठिकाणी लय पावे अन् परत पुन्हा येते
तुझी दिव्यता वर्णायाला कुंठित होते मति ।। ३ ।।
तुझ्या स्वरूपी महाभूते ही पांच इथे नांदति
चारही वाणी तुझ्या रूपाने जगति या दिसति
तू विद्येचा कर्ता असती ज्ञानाचा अधिपति ।। ४ ।।

अथर्वशीर्ष गीतमाला—गीत ५

## त्रिगुणांच्या तू पलिकडे रे राहसी गणेशा

त्रिगुणांच्या तू पलिकडे रे राहसी गणेशा
तूं कालत्रय तूं देहत्रय देवा जगदीशा ।। धृ ।।
तू उप्तत्ति, स्थिती आणि लय, शक्तित्रय रूप
योगीजन हे तुझेच ध्याति मंगल हे रूप
विघ्न निवारण करशील अमुचे हीच असे आशा ।। १ ।।

ब्रह्मा विष्णु महेश अससी इंद्र, अनल, वायू
सूर्य, चंद्रमा तूंचि ब्रह्मा, गीत तुझे गाऊ
तीन्ही जगाच्या ओंकारा रे धाव दयाळा ईशा ॥ २ ॥

अथर्वशीर्ष गीतमाला—गीत ६

## गणेश मंत्र हा रोज जपावा

गणेश मंत्र हा रोज जपावा
एक गणपति मला दिसावा ॥ धृ ॥
'ग' कार आधि प्रथम म्हणूनि
नंतर 'अ' ची गावी गाणी
अनुस्वार हे येता वचनी
अर्धचंद्र हा ओंकाराचा ॐ सदा ध्यावा ॥ १ ॥
मंत्र रूप हे तुझेच ध्याता
गकार होता भाव रहाता
सानुनासिक, अनुस्वार हा अन्ती एक असावा ॥ २ ॥
नाम गणपती भजनी रमता
एक नाद तो सुरेख गाता
संमीलन हे स्वरांत होता
संहितारूप उच्चाराने ओठी एक वसावा ॥ ३ ॥

अथर्वशीर्ष गीतमाला—गीत ७

## गणेश विद्या गणक ऋषीची गायत्री छंद

गणेश विद्या गणक ऋषीची गायत्री छंद
गणपती देई मना आनंद ॥ धृ ॥
ॐ गँ हे हो स्वरूप त्याचे त्यास नमस्कार
एकदंत तो विघ्ननिवारी, सुखद आधार
वक्रतुंड त्या गजाननाचा असा लागला छंद ॥ १ ॥

ध्यान तयाचे करितो आम्ही रोज गणेशाचे
तो भक्तिची देई प्रेरणा, सुख सामर्थ्याचे
उत्तम आणिक उदात्त देई भक्तिचा गंध ॥ :

अथर्वशीर्ष गीतमाला—गीत ८

## एकदंत हा असे गणपति

एकदंत हा असे गणपति
त्रैलोक्याचा तोच अधिपति ॥ धृ ॥
मूषक याचे वाहन आहे
पाश आणखी अंकुश आहे
रदवरद हीं शस्त्रें आहे
चार हातही ज्याला असती ॥ १ ॥
सुपासारखे कान तयाचे
वस्त्र तांबडे सुंदर त्याचे
शरीर वाटे रक्तांगाचे
आकर्षकही असे आकृति ॥ २ ॥
रक्तगंध हा ज्याच्या अंगी
रक्तफुलांचा हा अनुरागी
स्थिरस्थानी हा एका जागी
भक्तावरति करितो प्रीति ॥ ३ ॥
जेव्हा नव्हति येथे सृष्टि
पुरुष प्रकृति दोन्ही नव्हति
जगतासाठी भक्तासाठी
गणेश येथे जन्मा येती ॥ ३ ॥
ध्यान तयाचे करिता करिता
विसरूनि जाई जो या जगता
योगी होई तोचि तत्त्वता
ऋषी मुनीही ज्यास वंदिती ॥ ४ ॥

## व्रातपति हे प्रमथपति अन् दिव्य महागणपति

व्रातपति हे प्रमथपति अन दिव्य महागणपति
लंबोदर हा शिवसुत बघता कर माझे जुळती ।।धृ।।

एकंदत तूं विघ्नविनाशक वरदायक अससी
मस्तक ठेवी पुन्हा पुन्हा मी तुझिया चरणाशी
अथर्वशीर्ष हे वाचन करता विघ्नेही सरति ।।१।।

या स्तोत्राने पापे सरति सुख दारी येते
महापातके नाश होऊनि प्रसन्न मन होते
सायंकाळी पठणचि होता मिळे पाप मुक्ति ।।२।।

प्रातःकाळी वाचन करतां शांती मना मिळते
रात्रीच्या पापातून त्याची मुक्तीही होते
सकाळ सायंकाळी म्हणता पापें ती जळती ।।३।।

अथर्वशीर्ष गीतमाला–गीत १०

## अथर्वशीर्षाचें या चिंतन करता नित्य मनीं

अथर्वशीर्षाचे या चिंतन करता नित्य मनीं
चिंता हरवी चिंतामणी ।।धृ।।

या स्तोत्राचे चिन्तन करता
विघ्ने सरति, सरती चिंता
धर्म अर्थ अन् काम मोक्ष हे मिळती या जीवनीं ।।१।।

जिथे न आदर या स्तोत्राचा
कधि न सांगणे प्रभाव त्याचा
धन लोभाने कुणी शिकविता पापी होतो जनीं ।।२।।

सहस्त्रवेळा जप केला जर
सफल कामना होती निरंतर
अभिषेकाने स्तवता त्याला वक्ता होतो गुणी ।।३।।

अन्नोदक ही कांही न घेता
चतुर्थीला जर जप हा करता
विद्याधिपती होई येथे, हो मंगल वाणी ।।४।।

अथर्वशीर्ष गीतमाला–गीत ११

## अथर्वण मुनी हे तुज सांगति

अथर्वण, मुनी हे तुज सांगति
नित्य तूं पूजावा गणपति ।।धृ।।
ब्रह्मादिक जे असतील त्यांचे
करी निवारण तो मायेचे
निर्भय होती पूर्ण मनाचे
नित्य जे स्तोत्र घरी वाचति ।।१।।
दुर्वांकुर जे यज्ञीं वाहती
कुबेरापरी धनीक होती
जे लाह्यांचा होमहि करती
महायश कीर्ति संपादिती ।।२।।
सहस्त्र मोदक यज्ञी देती
इच्छित फल ते मिळे त्याप्रति
नवनीत, समिधा त्यांत अर्पिती
भक्त ते, भाग्याचे असती ।।३।।
आठ ब्राह्मणां स्तोस्त्र शिकविता
सूर्या इतुकी मिळे योग्यता
तेजस्वी तो होई सर्वथा
सर्व त्या सिद्धी कर जोडति ।।४।।
ग्रहण लागता ते सूर्याला
मंत्र जपावा नदीतीराला
मूर्ति जवळी जपता त्याला,
मंत्र ते सहज साध्य होती ।।५।।
महाविघ्नातून मिळते मुक्ति । महादोष ते सगळे सरती
महासंकटे विरुनि जाती । भक्त ते सर्वज्ञचि होती ।।६।।

# * अष्टविनायकांचा अभंग

रचयिता : डॉ. श्री. ग. देसाई

गजानन नाम । सुखाचे साधन ।
नेइ उद्‌धरून । संसारात ॥ १ ॥
जीवन—उद्यानी । भक्तीचे सिंचन ।
करूनिया मन । तोषवावे ॥ २ ॥
मोरगाव क्षेत्री । झाला मोरेश्वर ।
ख्यात विघ्नेश्वर । ओझरी तो ॥ ३ ॥
सिध्दटेकि आहे । सिद्धिविनायक ।
थेउरी पावक । चिन्तामणि ॥ ४ ॥
लेण्याद्रि क्षेत्रात । गिरिजात्मज राहे ।
वरदराज महढी । शोभतसे ॥ ५ ॥
बल्लाळेश्वराला । पालीमध्ये पाहू ।
आनंदा मिळवू । जीवनात ॥ ६ ॥
रांजणगावीचा । देव गणपती ।
स्मरोनिया मनी । मोद वाटे

* मोरया नामी मी रंगावे—भक्तियोग प्रकाशन पुष्प २
मधून पुनर्मुद्रित

# श्री गणेश जन्मकथा

गजवदनाच्या शुभजन्माची कथा सांगतों पुन्हा
हे आवर्तन, पुनरावृत्ति ही, गोड परी हा गुन्हा !
कुमार जाता तोंड फिरवुनी
शिव त्या पाठी शोधालागुनी
लोचनांतुनी झरती अश्रू स्वर्ग भासतो सुना
जवळ तियेच्या काळी माती
कर कोमल खिन्नपणे वळती
त्या मातींतुन कुमार उठता शोक जाहला दुणा
गिरिजेचे ते दुःख विलक्षण
विष्णूचे मन द्रवले कण कण
अमर त्याचिया करस्पर्शांतून कुमारास चेतना
तरूस यावा मोहर फिरूनी
त्याक्षम ये कार्तिकेय वळुनी
शिशुरूपांतुन त्या साऱ्यांना दिसे नवा पाहुणा
अवचित शनिची नजर तयावर
शिर त्या शिशुचे जाय उडुन वर
कबंध त्या बाळाचे दिसतां मातेला मूर्च्छना
शिव सरसावुन उठला जेव्हां
धडास गजमुख लागे तेव्हां
या जन्माच्या त्या जन्माला पुनरपि पटल्या खुणा
पुराणांतरीं गजवदनाला सार्थ अशी वन्दना
कर जुळवुनि मी भावें नमितों शंभुचिया नन्दना ।

**उमाकांत कीर**

# आरत्या



## सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ती दर्शनमात्रें मनकामना पुरती ॥धृ०॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा । हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ जय ० ॥ २ ॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे सदना । संकटीं पावावें, निर्वाणीं रक्षावें, सुरवर वंदना ॥जय०॥३॥



## नानापरिमळ दूर्वा शेंदूर शमिपत्रें

नानापरिमळ दुर्वा शेंदुर शमिपत्रें । लाडू मोदक अन्नें परिपूरित पात्रें । ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रें । अष्टहि सिद्धि नवविधी देसी क्षणमात्रें ॥ १ ॥ जय देव जय जय मंगलमूर्ती । तुझे गुण वर्णाया मज कैची स्फूर्ती ॥ धृ० । तूझें ध्यान निरंतर जे कोणी

करिती । त्यांची सकलहि पापें विघ्नेंही हरती । वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती । सर्वहि पावुनी अंतीं भवसागर तरती ॥ जय देय० ॥२॥ शरणागत सर्वस्वें भजती तव चरणीं । कीर्ति तयांची राहे जोंवर शशितरणीं । त्रैलोक्यीं ते विजयी अद्‌भुत हे करणी । गोसावीनंदन रत नामस्मरणीं । जय देव जय देव ०॥३॥

## शेंदूर लाल चढायो अच्छा गजमुखको

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको । दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको । हाथ लिये गुडलड्डु साई सुरवरको । महिमा कहे न जाय लागत हूँ पदको ॥ १ ॥ जय जय जी गणराज विद्या-सुखदाता । धन्य तुमारा दर्शन मेरा मन रमता ॥ धृ० ॥ अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरी । विघ्नविनाशन मंगल-मूरत अधिकारी । कोटीसूरजप्रकाश ऐसी छबि तेरी । गंडस्थळमदमस्तक गले शशि-बहारी ॥ जय० ॥ ॥ २ ॥ भाव भगतसे कोई शरणागत आवे । संतत संपत सबही भरपूर पावे । ऐसे तुम महाराज मोको अति भावे । गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ॥ ३ ॥

## आरती गणराया सर्व जग तव माया

( चाल : आरति ज्ञानराजा )

आरती गणराया
सर्व जग तव माया ॥ धृ० ॥
आधि नमु गौरीपुत्र
स्मरुं हृदयी पवित्र
विनायका सिद्धि देसी
भक्तहृदय निवासी ॥ १ ॥

वक्रतुण्ड एकदन्त
　　कृष्ण पिंगाक्ष अनन्त
गजवक्त्र लंबोदर
　　विकट तू मान्यवर ॥ २ ॥
विघ्नराज विद्या देवा
　　तुझा करू नित्य धावा
धूम्रवर्ण भालचंद्र
　　तूचि खरा तो महेन्द्र ॥ ३ ॥
विनायक गणपती
　　गजानन नामि प्रीती
पुरविसी अर्थकाम
　　भक्तिभावे घेता नाम ॥ ४ ॥
गणपतीचीं नांवें बारा
　　सर्वसिद्धिचा निवारा
त्रिकाल जो पाठ करी
　　विघ्नभय त्याचे दूरी ॥ ५ ॥



## लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा । विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा । लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ॥ १ ॥ जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरतीं ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ धृ ॥ कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा । अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा । विभुतीचे उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा । जय देव ॥ २ ॥ देवी दैत्यीं सागर

मंथन पै केले । त्यामाजी अवचित हलाहल सांपडलें । तें त्वां असुरपणे प्राशन केलें । निळकंठ नाम प्रसिद्ध झाले। जय देव ।।३।। व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन-सुखकारी । शतकोटीचे बीज वाचे उच्चारी । रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ।। जय देव ।। ४ ।।



## युगे अठ्ठावीस विटेवरी उभा

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ।। १ ।। जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ।।धृ।। तुळसी माळा गळां कर ठेंवुनि कटीं । कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढे राहती । जय० । ।। २ ।। धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा । सुवर्णाचीं कमळे वनमाळा गळां ।। राई रखुमाबाई राणीया सकळां । ओंवाळीती राया विठोबा सावळा । जय ।। ३ ।। ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती । चंद्रभागेमाजी सोडूनिया देती । दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय० ।। ।। ३ ।। आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमध्ये स्नाने जे करिती ।। दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ति । केशवासी नामदेव भावें ओवाळिती ।। जय देव जय देव जय० ।।५।।



## येई हो विठ्ठले माझे माऊली ये

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ।। निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहे ।। धृ ।। आलिया गेलिया हातीं धाडी निरोप ।। पंढरपुरीं आहे माझा मायबाप ।। येई० ।। ।। १ ।। पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला ।। गरूडावरि बैसोनि माझा कैवारी आला ।। येई० ।। २ ।। विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी । विष्णुदास नामा जीवेंभावें ओंवाळी । येई हो विठ्ठले ।। ३ ।। असो नसो भाव आम्हां तुझिया ठायां । कृपादृष्टि पाहें माझ्या पंढरीराया ।। ४ ।।



## दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा वेस्तारीं । वारीं वारी जन्म मरणांते वारी । हारीं पडलों आतां ांकट निवारी ।। १ ।। जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी ुरवर ईश्वर वर दे तारक संजिवनी ।। धृ ।। त्रिभुवन भुवनी पाहतां ुज ऐसी नाही । चारी श्रमले परंतु न बोलवे कांही । साही ववाद करितां पडलों प्रवाही । ते तूं भक्तालागी पावसि लवलाही ।। जय० ।। २ ।। प्रसन्नवदने प्रसन्न होसी निज दासा । क्लेशांपासूनि

सोडवि तोडीं भवपाशा । अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लीन झाला पदपंकजलेशा ।। जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी ।। सुरवर ईश्वरवरदे तारक० ।। ३ ।।



## त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्य-राणा । 'नेति' 'नेति' शब्द न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधिले ध्याना ।। १ ।। जय देव जय देव श्रीगुरुदत्ता । आरती ओवाळीता हरली भवचिंता ।। धृ ।। सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त । अभाग्यासी कैंची नकळे ही मात । पराहि परतली तेथे कैंचा होत । जन्म–मरणाचाहि पुरलासे अंत ।। जय. ।। २ ।। दत्त येऊनियां उभा ठाकला । सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला । प्रसन्न होऊनि आशिर्वाद दिधला । जन्ममरणाचा फेरा चुकविला ।।जय० ।। ३ ।। दत्त दत्त ऐसे लागले ध्यान । हारपले मन झाले उन्मन । मीतूंपणाची झाली बोळवण । एकाजनार्दनी श्रीदत्त ध्यान जय. ।।४।।

## घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रूप तुझें । प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन । भावें ओवाळीन म्हणे नामा ।। १ ।। त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव ।। २ ।। कायेन वाचा

मनसेंद्रिर्यर्वा, बुद्धयात्मना वा प्रकृतिस्वभावात् । करोमि यद्यत् सकलं परस्मै, नारायणा येति समर्पयामि ॥३॥ अच्युतं केशवं रामनारायणं, कृष्णदामोदरं वासुदेवं हरिं । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्र भजे ॥ ४ ॥

हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ॥
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ ५ ॥

## मंत्रपुष्पांजलि

ॐ यज्ञेन यज्ञमयजंतदेवास्तानिधर्माणिप्रथमान्यासन् ॥ तेहनाकं महिमानः सचंतयवपूर्वेसाध्याः संति देवाः ॥ ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । समे कामान् कामकामाय मह्यं, कामेश्वरी वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ॐ स्वस्ति, साम्राज्यं, भौज्यं, स्वराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठं, राज्यं, महाराज्यामाधिपत्यमयं संमतपयाईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आतांदापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिती ॥ तदप्येषश्लोकोभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्याऽवसन् गृहे ॥ आविक्षितस्यकामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

**मंगलमूर्ति मोरया**

---

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु ।
मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ।

# संतज्ञानेश्वरांनी केलेले श्रीगणेशवर्णन

ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।
'देवा तूंचि गणेशु । सकलार्थ मतिप्रकाशु ।' ।।२।।

अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारे ।।

त्याच्या श्रीविग्रहाचं वर्णन करताना ज्ञानदेवाची वाणी म्हणते—

मुक्तामाळा भव्यभूषणा । श्रुति नेती गजानना
तुझिया अंगींच्या नानाभूषणा । कोण वर्णी ।
प्रेमळपुष्पे दुर्वांकुरना । आभास नयना अगम्य दर्शना
सद्‌गुरुबोध प्रांजळा । मोदकबोध कृपाळा
गौरीनंदन घननीळा । मेघश्यामा ।
तू श्रेष्ठ मंगलध्यान । तुझे नाम आम्हां पावन
तुझियाने भक्तिमुक्ति । तुझियाने चाले स्फूर्ति
तुझियाने हा संसार । सार झाला ।
कुळस्वामिया गणपति । ज्ञानेश्वराची मंगलमूर्ति ।।

शद्व–ब्रह्म श्रीगणपतीच्या स्वरूपाची सुन्दर कांति म्हणजे स्वर आणि व्यंजनें; त्याच्या शरीराचे अवयव मनु आदींच्या स्मृती. रत्नखचित भूषणे म्हणजे अठरा पुराणे, रंगीत वस्त्र, उत्तम पद. रचना करगोटयाच्या घागऱ्या या काव्यें व नाटकें, कमरेचा शेला म्हणजे व्यासादिकांची बुद्धि. सहा हात हे सहा शास्त्रें. परशु हा तर्कशास्त्र-अंकुश न्यायशास्त्र. गोड मोदक हा वेदान्तशास्त्र. एका हातांतील मोडका दांत हें खंडित बौद्धमत. वरदहस्त म्हणजे सत्कारवाद. स्वभावसिद्ध अभयहस्त म्हणजे धर्मस्थापना करणारा. सरळ सोंडेचा सोंट हा महासुखाचा परमानंद. सूक्ष्म नेत्र ही ज्ञानदृष्टि. दोन कान हे पूर्व व उत्तर मीमांसा.

# संत रामदासांनी केलेले श्रीगणेशवर्णन

"सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदाने डुल्लत ।
हरुषे निर्भर उद्दित । सुप्रसन्नवदनु ।
असा गजानन ।
कसा त्याचा आकार ?
भव्य रूप वितंड । भीममूर्ति महाप्रचंड ।
विस्तीर्ण मस्तकी उद्दंड । सिंदुर चर्चिला ।
कसं ते मुख मंडळ ?
नाना सुगंध परिमळे । थबथबा गळती गंडस्थळे
शुंडादंड मुडित सरळे. . . .
चतुर्दशविद्यांचा स्वामी । न्हस्वलोचन ते हिलावी
लवलवीत फडकावी । फैडै फेडै कर्णथापा. . ."
मुकुटादि अलंकार—
रत्नखचित झळाळे । नाना सुरंग फाकती कीळे
कुंडलें तळपत नीळे । वरी जडिले चमकती

ठसठशीत पांढरा एकदंत शोभतो आहे. त्यातही सोन्याची कडी शोभताहेत. दोंद लवथवित (हालणारें). कमरेभंवती नागबंध कसला आहे. त्याखाली क्षुद्रघंटिकांचा मंजुळमधुर झंकार उमटतो आहे. कमरेच्या बंधनातला नागराज मात्र महाभयंकर फुत्कारतो आहे. मत्तपणें डोलतो आहे. आपली लवलवती चंचल जीभ वारंवार बाहेर काढतो आहे. नाभीजवळ मस्तक ऊंचावून दर्शनार्थीकडे टकमका बघतो आहे.

गळ्यांत नानापरींच्या कुसुमांच्या मालांचं भाग्य सुगंधित झालं आहे, हातात विशाल परशू, प्रफुल्ल कमळ आणि तीक्ष्ण धारेचा तेजाळ अंकुश उगारला आहे. एका हाती सुरस मोदक गोळ आहे ज्याची त्याला अति आवड आहे.

# श्री गणपति भक्तिदर्शन

श्री गणेश उपासनेस पूरक पुस्तक—पृष्ठे ९६ किंमत ५० पैसे

( फारच थोडया प्रति शिल्लक आहेत )

**पुस्तकाचे अंतरंग—**

* मधुकर जोशीकृत ' भूपाळी '
* ' गोसावीसुत ' कृत प्रार्थना
* वक्रतुंड महाकाय......
* बिघ्नेश्वराय वरदाय
* नमस्ते गणनाथाय
* सुमुखश्च एकदन्तश्च......
* संकटनाशन गणेश स्तोत्र
* वन्दे गणपतिम् ( नवीन स्तोत्र )
* **ही काव्याची..माला दूर्वांची**
  ( प्रातःपठणीय दीर्घ काव्य )
* **तया श्रीगणेशा नमूया भजूया**
  ( गणेश पुराणान्तर्गत श्रीगणेशाष्टकाचा श्लोकानुवाद )
* **श्री सिद्धिविनायक स्तोत्र ( नवीन )**
* **ऐसा गणेशु पूजिजो**
  ( गणेश गौरवात्मक नवा दीर्घ लेख )
* **श्रीक्षेत्र टिटवाळा महागणपति दर्शन ( ओवीबद्ध )**
* **श्रीगणेशाचे एकाक्षरी महामंत्र ' ॐ श्रीं गँ '**
  **आणि इतर मंत्र**
* **गणेश चतुर्थीचें व्रत**

**श्रीगणपति भक्तिदर्शन** पुस्तकाचे अंतरंग—पुढे चालू

* विनायकी संकष्टीबाबत माहिती देणारा दीर्घ लेख
* चंद्राच्या गर्वहरणाची गोष्ट–चंद्राचा व संकष्टीचा संबंध
* दुर्वा महात्म्य–गणेश पुराणातील कथा भाग
* श्री गणपति अथर्वशीर्ष (मूळ संस्कृत)
* कवि मधुकर जोशी कृत
  अथर्वशीर्ष गीत माला
  (११ भावानुवादी गीतें
* संकट हरण श्री गणेश व्रत
* श्री गणपतीची १०८ नित्यस्मरणीय नामें
* उद्यान गणेश स्तोत्र

× अष्टविनायक स्तोत्र
× नमो अष्टसिद्धि नमो अष्टरूपा
× मनोरथ सिद्धि स्तोत्र
× आरत्या
× मंत्रपुष्पांजलि
× अथर्वशीर्ष आवर्तनांस उपयुक्त तक्ता

**घाऊक विक्रीसाठीं व्यापारी कमिशन, डिलिव्हरी इत्यादिच्या चौकशीसाठीं लिहा:**

**भक्तियोग प्रकाशन,**
९, शॉपिंग सेंटर,
सहकारनगर, वडाळा,
मुंबई ४००.०३१.


सिद्धि विनायक
महागणपति
टिटवाळा

# श्रीगणपति अथर्वशीर्ष

## मराठी भाषांतराबाबतचा महत्त्वाचा खुलासा–

श्रीगणेशोपासनेचें एक आवश्यक साधन—

**श्रीगणपति अथर्वशीर्ष** (मूळ संस्कृत) ह्या पुस्तकाद्वारें गणेशभक्तांस उपलब्ध करून दिलेलें आहेच. अथर्वशीर्षाचा कवि मधुकर जोशीकृत गीतानुवाद व डॉ. सी. ग. देसाई, M. A., Ph.D., रचित गेय अनुवादही ह्या पुस्तकात पुनर्मुद्रित केलेले आहेत. अभ्यासू भक्तांस त्यांचा निश्चित उपयोग होईलच. **अथर्वशीर्षाचें सरळ मराठी भाषांतर ह्या पुस्तकांत विस्तारभयास्तव छापलेलें नाहीं.**

(सदरहू भाषांतर परिशिष्ट 'अ' मधून छापावयाचा विचार आयत्या वेळी रद्द केला आहे. क्षमस्व)

ज्या कोणास सदरहू भाषांतर हवेंच असेल, त्यांनीं स्वनांवपत्त्याचा (२५ पैसे तिकिटाचा) पोष्टाचा लखोटा खालील पत्त्यावर पाठविल्यास भाषांतराची छापील प्रतही त्यांना विनामूल्य पाठवण्यात येईल.

भाषांतर मागविण्याचा पत्ता :
**भक्तियोग प्रकाशन**
९, शॉपिंग सेंटर,
सहकारनगर, वडाळा,
मुंबई ४०००३१.

जगी नित्य रक्षी मला मागुनीया
पुढोनी तसे ह्या भवाते तराया ॥८॥

वरूनी तसे खालती दक्षिणेला
करी रक्षणा पश्चिमा उत्तरेला
तसे पूर्व बाजूस रक्षी दयाळा
तुझे ध्यान चित्ती करी मी कृपाळा ॥९॥

प्रभो वाङ्मया चिन्मया मोदयुक्ता
सदा सच्चिदानंद तूं विघ्नहर्ता
असे ज्ञान विज्ञान सारे तुझ्यात
तुझे रूप ते ब्रह्म साक्षात्पुनीत ॥१०॥

दिसे सर्व जे तें तुझ्यापासुनीया
इथे जन्मुनी धारणा लाभुनीया
तुझ्यामाजि ते अन्ति होई विलीन
तुझ्या आत्मरूपात जाई विरोन ॥११॥

तुझे रूप ते भूमि आकाश आप
तुझे रूप ते तेज वायू अमाप
तशा चार वाणी परादी तुझ्यात
म्हणोनी तुझे नाव वागीश ख्यात ॥१२॥

गुणांच्या त्रयातीत तू नित्यरूप
तसा तीन देहांहुनी भिन्नरूप
असो भूत भावी तथा वर्तमान
त्रिकाळास भेदून होसी समान ॥१३॥

तुझा मूळ-आधार चक्रात वास
तुझ्यामाजि शक्तित्रयांचा निवास
तुला नित्य योगी मनामाजि ध्याती
तयां आत्मरुपात येई प्रचीती ॥१४॥

तुझे रूप ब्रह्मा तसा विष्णु रुद्र
तुझे रूप इन्द्राग्नि तो सूर्य चन्द्र
तुझे रूप वायुत ब्रह्मात आहे
तसे भूर्भुवस्वःत ते नांदताहे ॥१५॥

गणादी म्हणोनी अकारा म्हणावे
अनुस्वार अर्धेंदुयुक्ते स्मरावे
म्हणावा सदा मंत्र ॐकारयुक्त
असे हे गणेशा तुझे तंत्ररूप ॥१६॥

'गँ' तंत्ररूपास ॐकारयुक्ता
जपावे तयाने मिळे शांति चित्ता

# जय जय गणराज समर्थ

श्रीगणपति अथर्वशीर्षाचा श्लोकबद्ध अनुवाद

रचना : डॉ. सी. ग. देसाई

## शांतिपाठ

सदा भद्र ते कान ऐकोत देवा
सदा भद्र ते चक्षु पाहोत देवा
असे कल्पिले आयु जे ब्रह्मयाने
जगावे पुरे ते निरोगी तनूने ।।१।।

रहावी सदा शक्तिशालीच अंगे
स्तुतिस्तोत्र देवा करू भक्तिरंगे
तुझ्या याजनी पूजनी जीवनाचा
कळावा खरा अर्थ आम्हा सुखाचा ।।२।।

करो स्वस्ति सर्वत्र तो इंद्रदेव
जयाच्या धनाचा नसे पूर्ण ठाव
जगी स्वस्ति विश्वज्ञ पूषा करू दे
तसा संकटा पक्षिराजा हरू दे ।।३।।

सुरांचा गुरू स्वस्ति शांतीस देवो
त्रिकाळात तैसी त्रिधा शांति होवो
अशी गाउनी प्रार्थना नम्र भावे
गणेशा तुझे स्तोत्र वाचे वदावे ॥४॥

मूळ स्तोत्र

गणेशा तुला मी करी वंदनास
जगी तत्त्व प्रत्यक्ष तू निर्विशेष
जगा निर्मुनी पाळिसी तूच त्यास
तसे अन्ति संहारिसी तू तयास ॥५॥

असे सर्व जे ब्रह्म ते तूचि आहे
मदीयांतरंगी तुझे रूप पाहे
सदा सर्व भूतांत आत्मस्वरूप
ऋतोक्ती असे सत्य हे नित्यरूप ॥६॥

करी रक्षणा माझिया रे गणेशा
तसे रक्षि वक्त्यास श्रोत्या, परेशा
सदा देवकार्यी करी दानधर्म
तया रक्षि धात्यास जो पाळि धर्म ॥७॥

जयाने जगी वेद कंठस्थ केले
तयाला तुवा पाहिजे तारीयेले

गकारा म्हणोनी अकारा स्मरावे
अनुस्वार अर्धेंदुयुक्तास गावे ॥१७॥

असा 'गँ' पदाचा घुमावा निनाद
तया संहिता संधिने स्पष्ट नाद
गणेशा तुझी हीच तंत्रोक्त विद्या
जियेची असे देवता तूचि आद्या ॥१८॥

'ॐ गँ' नमू या गणांच्या पतीला
तया एकदन्तस्वरूपा यतीला
जये खंडिली वक्र बुद्धी जगात
तया वक्रतुंडा मनी साठवीत ॥१९॥

असा दंति तो प्रेरणा नित्य देतो
चतुर्हस्त जो दन्त हाती धरीतो
असे पाश अंकूश तैसाच हाती
सदा दाखवी स्वकृपा जो जनान्ती॥२०॥

शरीरी तुझ्या लेप हा चंदनाचा
तुझा डौल तो रक्तवस्त्रात साचा
तुझ्या पूजनी रक्तपुष्पे वहावी
तुझी नित्य सेवा गणेशा करावी ॥२१॥

तुझ्या मूषकाच्या ध्वजाते स्मरावे
तुझ्या शूर्पकर्णा गुणा आठवावे
करी जो कृपा भक्तवृंदावरी तो
असा देव तू या जगा हेतु होतो ॥२२॥

असे देव तू सृष्टिपूर्वी अनादी
तसा प्रकृतीचा असे तूच आदी
असे प्रकृतिप्रेरकाच्या अतीत
तुझे रूप ध्याती जगी तेच मुक्त ॥२३॥

करी नित्य योगी अशी साधना जो
तया योगिश्रेष्ठांत श्रेष्ठत्व दे जो
गणांच्या पतीला तया एकदन्ता
नमू व्रातमुख्यास जो विघ्नहर्ता ॥२४॥

नमू या तया श्रीशिवाच्या सुताला
असे मूर्ति जी सौख्यदा ह्या जगाला
नमू या तया त्या गणांच्या पतीला
सदा विघ्नहर्त्यास लंबोदराला ॥२५॥

आगामी प्रकाशन ( पुष्प ७ वें )
● गीतमाला श्रीमहाभारताची ●

## फलश्रुति

करी पाठ जो नित्य हे स्तोत्र त्याला
सदा ब्रह्मरूपात ठेवा मिळाला
तयाला मिळे सर्वदा सौख्यप्राप्ती
नुरे अल्पही विघ्नचिंता स्वचित्ती ॥२६॥

तयाला मिळे पंच पापांतुनीया
झणी मुक्ति स्तोत्रास ह्या वाचुनीया
सकाळी म्हणोनी निशापातकांना
करी दूर सायं दिवापातकांना ॥२७॥

करी पाठ सायं तसे जो प्रभाती
तयाला नसे अल्पही पापभीती
सदा सर्वदा पाठ आथर्वणाचा
करी विघ्ननाशास भावार्थ त्याचा ॥२८॥

तयाला मिळे धर्म तैसाच अर्थ
मिळोनी मनीचा पुरे काम स्वार्थ
मिळे अंति मुक्ती तया पाठकाला
नये स्तोत्र देऊ कुमार्गी नराला ॥२९॥

जयाच्या मनी भाव श्रद्धा नसेल
तयाला न द्यावे जगी स्तोत्र, फोल
जरी द्रव्यलोभे कुणाला प्रदान
करी स्तोत्र तो पातकी हो महान ॥३०॥

सहस्रावरी पाठ याचे करील
तरी सत्वरी वांछिता पाविजेल
असे स्तोत्र गाऊन देवास स्नान
जगी घाली तो होय वक्ता महान ॥३१॥

चतुर्थी तिथीला निराहार राही
तया प्राप्त विद्या जगी नित्य पाही
असे सत्य ही उक्ति आथर्वणाची
जरी जाणली नष्ट चिंता भवाची ॥३२॥

असे सत्स्वरूपावरी अभ्र आले
स्वरूपी रमे ते तदा दूर झाले
कुणाची नसे भीति त्याला भवात
सदा नित्य विघ्नेश ध्याई मनात ॥३३॥

जरी पूजीला देव दूर्वांकुरांनी
कुबेरापरी सौख्य त्याला मिळोनी

जगामाजी तैसाच स्वर्गी प्रमोद
सदा लाजहोमे यशाचा प्रसाद ।।३४।।

तया प्राप्त होई तदा तीक्ष्ण बुद्धी
मनी पूजिता प्राप्त होईल ऋद्धी
सहस्रावरी मोद्का यज्ञि दान
तया लाभतो वांछितार्थ प्रसन्न ।।३५।।

गणेशास होमात अर्पिल भक्त
समिद्पूर्ण स्वाहा असे जी घृताक्त
तरी सर्व लाभेल हे सत्य पाहे
द्विजा आठ, स्तोत्रास जो देत आहे।।३६।।

जगी मंत्र हा सिद्ध व्हाया जपावे
नरे स्तोत्र सूर्यग्रही भक्तिभावे
गणेशा तुझ्या मूर्तिसान्निध्ययोगे
नद्यांच्या तटी ज्यामुळे तेज जागे ।।३७।।

महाविघ्न आले तरी ते टळेल
महादोषही सत्वरी भंगतील
महापातकांपासुनी होय मुक्ती
तया सर्व विद्या जगी प्राप्त होती ।।३८।।

असे जाणले सार ज्यांनी मनात
तया मुक्ति लाभे स्वरूपी निवांत
असा अर्थ हा सांगते श्रौतविद्या
अशी ही अथर्वोक्त ती आद्य विद्या ।।३९।।

गुरूने तसे शिष्यवृंदे असावे
सदा सौमनस्ये स्वकार्यी रमावे
नको द्वेष सर्वत्र शांति प्रभाव
तयांचा सदा हा मनी नम्र भाव ।।४०।।

करावे गणेशे सदा रक्षणास
तयाच्या करी जो अशा या जपास
मिळावी तया सौख्यशक्ती अपार
असे चिंतुनी अर्पिता पुण्य फार ।।४१।।

असे मूळ गीर्वाण हे स्तोत्र काम्य
तया प्राकृतामाजि वाचून पुण्य
'गणेशात्मजा'* ने अशी शब्दपूजा
असे वाहिली, धन्य तो विघ्नराजा ।।४२।।

।। जय जय गणराज समर्थ ।।

( * डॉ. सीताराम गणेश देसाई )

परिशिष्ट ' क '

अल्प परिचय

# प्रा. डॉ. सीताराम गणेश देसाई

एम्. ए., पी. एच. डी., ज्योतिष प्राज्ञ.

( झाला वेदांत पारितोषिक विजेते )



जन्म १५ मे, १९२८

१९५० साली मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. परिक्षेत संस्कृत प्रमुख विषय व मराठी गौण विषय घेऊन प्रथम श्रेणी व १९५२ साली एम्. ए. परिक्षेत तेच विषय घेऊन द्वितीय श्रेणी व **झाला वेदान्त पारितोषिक** मिळविले. १९५२ साली मुंबईत नवीनच सुरू झालेल्या रुपारेल कॉलेजात संस्कृतचे लेक्चरर म्हणून नेमणूक. १९६२ साली मुंबई विद्यापिठाची **'नव्य उपनिषदांचा सर्वांगीण अभ्यास'** या इंग्रजीतील प्रबंधाबद्दल **पी. एच. डी.** पदवी मिळाली.

भावार्थ श्रीगुरुचरित्र, श्री दासबोधाची तोंडओळख, चल चल रे मुंज मुला, असा आमुचा लग्न सोहळा, देवी दर्शन, बंधन आणि मुक्ति, आळशांचा राजा, सुभाषित मधुघट, वगैरे पुस्तके लिहून त्यांनी संपादन केलेल्या कीर्तीत १९६८ मध्ये अखिल भारतीय पातळीवर युनेस्को प्रणित सहाव्या स्पर्धेत **' तिळा उघड ' ह्या उत्कृष्ट पुस्तकाबद्दल १६०० रुपयांचे** प्रथम पारितोषिक

मिळाले व १९६९ साली त्याच स्पर्धेत ' सुबोध कथा ' ह्या पुस्तका-बद्दल १४०० रु. चे पारितोषिक मिळविले.

कोणत्याहि विषयावरील **ओवीबद्ध रचना करण्यात डॉ देसाई सिद्धहस्त आहेत. ' आम्ही सारे पृथ्वी पुत्र '** मध्यें त्यांनी जगाचा परिचय आणि त्यांतहि भारताच्या श्रेष्ठत्वाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वबंधुत्वाचा व शांततेचा पुरस्कार करणारे हे पुस्तक प्रत्येक वाचनालयात असण्याच्या योग्यतेचे आहे.

डॉ. देसाईंच्या वडिलांनी ( कै. श्री. **गणेश गोपाळ देसाई** यांनी ) केलेल्या सुमारे एक तपाहूनहि जास्तच्या ' श्रीमत् नारायण' मंत्र जपाची पुण्याईच आपल्या पाठीशी आहे हें ते विनम्रपणे सांगत असतात. नजीकच्या भविष्य काळांत मुद्गल पुराण (३०००० हून जास्त) ओव्यांनी अनुवादित करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

भक्तियोग प्रकाशनच्या संचालकांचे कॉलेज-जीवन मार्गदर्शक आणि भक्तियोग प्रकाशनच्या प्रारंभापासून लेखन सहकार्य आणि इतर बाबतींत मार्गदर्शन करून श्री. देसाई हे भक्तियोग प्रकाशनचे एक आधारस्तंभ सिद्ध झाले आहेत.

REFBK-0020107
REFBK-0020107

---

**भक्तियोग प्रकाश**...

## " उपासना श्रीमहागणपतीची "

**हे पुस्तक आपल्या संग्रही हवेच**




**कपिलतीर्थ विद्यापीठ**

भारतीय कलांच्या विकासार्थ झटणारी संस्था

संस्थापक : **प्रभुराम ओतुरकर**

यांजकडून भक्तियोग प्रकाशनला

**हार्दिक शुभेच्छा**



प्रणव 'ॐ' कारयुक्त श्रीगणेश